

## नासा येवतीकर




# शाळा आणि शिक्षक



# शाळा आणि शिक्षक

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# शाळा आणि शिक्षक

ना सा येवतीकर

ई साहित्य प्रतिष्ठान

# शाळा आणि शिक्षक

लेखक
नागोराव सा. येवतीकर
http://nasayeotikar.blogspot.com
फ़ोन – 9423625769

पत्ता : नागोराव सा. येवतीकर

मु. येवती पोस्ट येताळा
ता. धर्माबाद जि. नांदेड

ईमेल - nagorao26@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

## प्रकाशक  :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

**e**sahity@gmail. com

**e**Sahity Pratishthan

**e**leventh floor

**e**ternity

**e**astern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841

App : https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.

प्रकाशन  : १ जून २०१८





©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य - प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे .


नासा येवतीकर
मी...
एक शिक्षक


जागृती
नासा येवतीकर


संवेदना
नासा येवतीकर


नासा येवतीकर
हरवलेले डोळे
कथासंग्रह

ना सा येवतीकर



शाळा आणि शिक्षक हे ना सा येवतीकरांचे ई साहित्य प्रतिष्ठान तर्फ़े प्रकाशित होणारे पाचवे पुस्तक. शिक्षक, शाळा आणि एकूणच शिक्षण व्यवस्था यांचा नासा यांनी खोलात जाऊन अभ्यासही केला.

पण नासा त्यावर थांबले नाहीत. त्याहूनही खोलात जाऊन त्यांनी चिंतन, चर्चा आणि प्रत्यक्ष अनुभव यांच्या आधारे प्रचंड लेखन केले. देशप्रेम म्हणजे देशाच्या भवितव्याचा विचार आणि देशाचे भवितव्य म्हणजे शिक्षण हा त्यांचा ठाम विचार आहे. आणि अत्यंत तळमळीने ते शिक्षण व्यवस्थेवरचे विचार लोकांपर्यंत जावे म्हणून स्वतःच्या खिशाला खार लावून आणि व्यक्तिगत खुशालीची पर्वा न करता जागृती करण्याचे कार्य ते करत असतात. व्यवसायाने ते प्राथमिक शिक्षक (जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिरली, ता. बिलोली जि. नांदेड) आहेत.

शालेय जीवनापासुनच लिखाण करण्याची फारच आवड त्यामुळे विविध वर्तमानपत्र, दैनिक, साप्ताहिक, मासिकात वैचारिक लेख लिहिण्याचा त्यांना छंद आहे. जीवन-शिक्षण या शैक्षणिक मासिकातून सुध्दा यापूर्वी लेख प्रकाशित झाले आहेत. दैनिक लोकपत्रमध्ये दर सोमवारी ऑफ पिरियड सदराखाली एक वर्ष

स्तंभलेखन केले आहेत, ज्यात शैक्षणिक विषयी विचार मांडले होते. ते लहान मुलांसाठी सुध्दा छोटेखानी लेख लिहितात तसेच त्याना मनोरंजनातून शब्दसंपत्ती वाढवी यांसाठी विविध मनोरंजक शब्दकोडे तयार करतात. जे की दैनिक देशोन्नतीच्या फनक्लब पेजवर प्रकाशित झाले आहेत. यापूर्वी याच ई साहित्यच्या मदतीने संवेदना, मी एक शिक्षक हे वैचारिक लेख असलेले ई बुक आणि हरवलेले डोळे हा ई कथासंग्रह प्रकाशित करण्यात आले आहे.विद्यार्थ्यांना सतत कामात व्यस्त ठेवण्यासाठी विविध उपक्रम तयार करतात आणि त्यां उपक्रमाच्या माध्यमातून शिकविण्याचा प्रयत्न असतो.

आता यावर्षी त्यांचे जागृती हे अंजन घालणारे चवथे पुस्तक सादर केले व. वाचकांना ते आवडले. आता शाळा आणि शिक्षकबद्दल वाचकांच्या प्रतिसादाची आम्ही वाट पाहू.

कृपया आपली मते नासा सरांना कळवा. त्यांचा संपर्क क्रमांक 9423625769 असून nagorao26@gmail.com हा त्यांचा मेल पत्ता आहे.

नासा हे सातत्यपूर्ण लेखक आहेत आणि आपले लेखन त नियमित रित्या ब्लॉगवर प्रसिद्ध करत असतात. त्यांचा http://nasayeotikar.blogspot.com हा ब्लॉग तुम्हाला नक्की आवडेल.

त्यांच्या संपर्कात रहा. तुमचे विचार त्यांच्यापर्यंत पोहोचवा. नासांच्या तळमळीने चाललेल्या नवभारतनिर्माणात आपण सामिल व्हा.

सुनील सामंत

टीम ई साहित्य प्रतिष्ठान

पाचव्या पुस्तकाच्या निमित्ताने




शाळा आणि शिक्षक हे पुस्तक आपल्या हाती देताना मला मनस्वी विशेष आनंद होतो आहे. जिल्हा परिषदेच्या शाळेत गेल्या 10 वर्षांपासून अनेक घडामोडी घडले आहेत. बरेच काही बदल झाले आहेत. शाळेला लोकसहभाग मिळाले तर शाळेचा संपूर्ण कायापालट होऊ शकतो हे काही शाळांनी करून दाखविले आहे, ते अत्यावश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत प्रत्येक बाब महत्वाचे आहे त्यातल्या त्यात वाचन खूप महत्वाचे याचे विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे. हे सर्व करतांना ऑनलाईनच्या प्रक्रियेमुळे शिक्षक कामात कसा गुरफटलेले आहेत हे ही यात वाचायला मिळेल. कॉपी करणे शिक्षण प्रक्रियेत एक कलंक आहे. ती पुसली जाणे आवश्यक आहे. दहावी आणि।बारावीची परीक्षा प्रत्येक विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक महत्वाचे वळण आहे हे पालक आणि शिक्षकांनी जाणून घ्यावे. डिजिटल शाळा आणि त्या अनुषंगाने सर्व बाबी जे की शाळा स्तरावर नेहमी चर्चिले जातात, त्या विषयी फोकस केलेले आहे.

शाळा हेच शिक्षणाचे केंद्रबिंदू असून शिक्षक हाच विद्यार्थ्यांचा शिल्पकार आहे याची जाणीव रोजच्या अध्यापनातून झाली आणि ते मी या ई पुस्तकाच्या माध्यमातून आपणासमोर मांडण्याचा एक छोटासा प्रयत्न केला आहे.

प्रत्येक।शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांना घडविण्याचा प्रयत्न केल्यास एक नवा गुणवत्तापूर्ण समाज बघायला मिळेल अशी आशा वाटते.

या पुस्तकात काही चूका किंवा त्रुटी आढळून आल्यास निःसंकोचपणे त्या चूका माझ्या निदर्शनास आणुन दिल्यास मी आपला अत्यंत आभारी राहीन. पुस्तकातील विचार किंवा हे पुस्तक आपणास आवडल्यास आपल्या मित्र परिवारात जरूर share कराल अशी अपेक्षा करतो. समीक्षक मित्रांनी या पुस्तकाचे समीक्षण करून त्यास प्रसिद्धी द्यावे. ही नम्र विनंती. धन्यवाद

- नागोराव सा. येवतीकर

फ़ोन – 9423625769

पत्ता : नागोराव सा. येवतीकर

मु. येवती पोस्ट येताळा
ता. धर्माबाद जि. नांदेड

ईमेल - nagorao26@gmail.com

# अर्पण पत्रिका

शिक्षक म्हणून मला तयार करण्यासाठी प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या प्रोत्साहित करणारे माझ्या आई-वडील, भाऊ-बहीण आणि मित्रासह सर्वांना अर्पण ..........

नागोराव सा. येवतीकर

★★★★★★★★★★★★★★★★★★★★

शुभेच्छाच्या निमित्ताने ..

-----------------------------------------------

लेखक ना.सा.येवतीकर मराठवाड्यातील ग्रामीण भागात अध्यापनाचे कार्य करणारे एक प्राथमिक शिक्षक आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्वातील लेखकाने शिक्षक ना.सा.येवतीकर यांना एक वैचारिक आणि चिंतनशील असा दृष्टीकोन दिला आहे त्यामुळे हा शिक्षक नुसते अध्यापन करून स्वस्थ बसत नाहीये. तर आपण ज्या क्षेत्रात नोकरी करतो त्या क्षेत्रातील गोष्टींबद्दल आपली एक सामाजिक बांधिलकी आहे आणि ही जबाबदारी आपण गांभीर्याने पार पाडली पाहिजे , अशी त्यांची मनोधारणा आहे.

लेखक ना.सा.येवतीकर यांच्या "शाळा आणि शिक्षक " या नव्या ई-बुकात छोट्या-छोट्या लेखातून शाळा आणि शिक्षक यांच्याबद्दल विविध लेख वाचण्यास मिळते. सध्या नवीन तंत्रज्ञान-आत्मसात केल्याशिवाय शिक्षकाना नव्या पिढीशी संवाद साधणे शक्यच होणार नाहीये या अतिशय महत्वाच्या विषयावर तीन-चार लेखातून त्यांनी प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. ' शाळा हेच विकासाचे केंद्र', 'बदलत्या काळात शिक्षकाची भूमिका', 'शिक्षक - समाजाचा खरा शिल्पकार ' या लेखातून शिक्षकांच्या पुढे असलेल्या जबाबदारीचे महत्व लेखकाने विषद केले आहे. या सर्वच लेखनाला एक सामाजिक कार्याचे स्वरूप आहे, कारण एकट्या शिक्षकाने हे कार्य केले पाहिजे, ही अपेक्षा किती चुकीचे आहे, हे लेखकाने काही लेखनातून खूप प्रभावीपणे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. 'लोकसहभागातून शाळा विकास ', 'ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षण' या लेखांचे उदाहरण या संदर्भात देता येईल. शहरी विभाग, निम-शहरी विभाग या दोन्हीतील शिक्षणव्यवस्था आणि ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्था त्यातही प्राथमिक -शिक्षण यांच्यात असमानता आहे हे आपण सर्व पहातो आहोत. लेखक ना.सा.येवतीकर एका छोट्याश्या खेडेगावातील प्राथमिक शाळेत कार्यरत आहेत. अध्यापन करणाऱ्या या शिक्षकाने या भागातील शैक्षणिक परिस्थितीचे चित्रण करतांना आलेल्या अनुभवातून यापुढे सर्वांना काय करता येणे शक्य आहे हे मोठ्या तळमळीने सांगितले आहे, याचे कौतुक करायला हवे आहे. विद्यार्थी आणि व्यक्तिमत्व विकास या संदर्भात पालक आणि बालक दोघांशी खूप छान संवाद साधला आहे त्यादृष्टीने ' लिहिण्याला पर्याय नाही ', ' एकच ध्यास - वाचन विकास', ' मुलांच्या प्रगतीसाठी' , ' विद्यार्थी अप्रगत का राहतो' हे लेख खूप छान आहेत. वैचारिक आणि चिंतनशील असे हे लेखन समाज-प्रबोधन करणारे आहे. यास वाचकांचा प्रतिसाद नक्कीच लाभणार आहे. लेखक व शिक्षक ना.सा.येवतीकर यांच्या उपक्रमशील प्रवासास तसेच शाळा आणि शिक्षक ई बुकसाठी अनेकानेक शुभेच्छा.

स्नेहांकित -

अरुण वि.देशपांडे

साहित्यिक, पुणे.

9850177342

' नासा' ची चिंतनीय लेखमाला

नागोराव येवतीकर हे उपक्रमशील, ध्येयवेडे आणि सातत्याने काहीतरी नाविन्यपूर्ण अशा कृतींमध्ये रमणारे असे व्यक्तित्व ! गेली अनेक वर्षे ते मराठवाडाच नव्हे तर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून प्रकाशित होणाऱ्या वर्तमानपत्रातून शैक्षणिक उपक्रमांसोबत सामाजिक विषयांवर लिहिणारे एक आघाडीचे लेखक म्हणून सर्वदूर परिचित आहेत. गेल्या काही वर्षांपासून भ्रमणध्वनी हे एक क्रांतिकारी साधन अस्तित्वात आले आहे. भ्रमणध्वनीच्या माध्यमातून केवळ मौखिक शब्दांद्वारे व्यक्त होता येते हा समज बाजूला झाला.भ्रमणध्वनीवर फेसबुक, व्हाट्सअप, व्टिटर, मेसेंजर अशी साधने प्रकट झाली आणि त्यामुळे सामाजिक माध्यमांमध्ये एक महान क्रांती घडून आली. नागोराव येवतीकर यांनी या सामाजिक माध्यमांचा शैक्षणिक आणि सामाजिक प्रगतीसाठी सुरेख उपयोग करायला सुरुवात केली आणि त्यात ते कमालीचे यशस्वी झाले. अभ्यास, जिद्द धाडस, कष्ट, तळमळ अशा गुणांमुळे त्यांचे ई लिखाण सर्वत्र लोकप्रिय होत गेले. त्यांची पाच ई पुस्तके प्रकाशित झाली आहेत . यावरून त्यांनी या क्रांतिकारी माध्यमाचा उपयोग समाजात, शैक्षणिक विश्वात एक क्रांती निर्माण करण्यासाठी केला हे दिसून येते.

'शाळा आणि शिक्षक' हे त्यांचे ई पुस्तक लवकरच प्रकाशित होत आहे .या शीर्षकावरून पुस्तकात शैक्षणिक विचार, शिक्षण व्यवस्था याबाबत लेखन असणार हे लक्षात येते. 'शैक्षणिक विकास' हा त्यांच्या लेखांचा आत्मा आहे. शैक्षणिक क्षेत्राला लागलेले ग्रहण म्हणजे कॉपी ! ही कॉपी कशी फोफावली,

कॉपीमुक्त शिक्षण क्षेत्र कसे होईल यावर 'कॉपी म्हणजे एक कलंक' या लेखातून येवतीकरांनी अभ्यासपूर्ण दृष्टिक्षेप टाकला आहे. 'नकला मारणे म्हणजे एक प्रकारे चोरी करण्यासारखे आहे..' असे सांगून हा प्रकार किती अपराधजन्य आहे याची जाणीव ही ते करून देतात. कॉपी करणे हे नीतिमत्ता नसल्याचे लक्षण आहे असेही लेखक आवर्जून सांगतात. यशस्वी जीवनाची 'वाचन, चिंतन आणि लेखन' ही त्रिसूत्री लेखकाने विद्यार्थ्यांपुढे ठेवली आहे. वाचनाचे महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उदाहरण दिले आहे ते अनुकरणीय असेच आहे.

शिक्षणक्षेत्रात शिक्षक आणि विद्यार्थी यांचे नाते अत्यंत जवळचे आहे. शिक्षण क्षेत्रात क्रांती घडवून आणून विद्यार्थ्यांचा योग्य सर्वांगीण विकास फक्त शिक्षकच करू शकतो. प्रत्येक विद्यार्थ्याच्या अंगी वेगळा असा एखादा महत्त्वाचा गुण असतो. या गुणास प्रकटीकरणाची संधी मिळण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम हे उत्तम व्यासपीठ हे 'सांस्कृतिक कार्यक्रमांतून विद्यार्थ्यांचा विकास' या लेखात विस्ताराने नमूद केले आहे.

'शाळेला गावाचा अभिमान असावा, गावाला शाळेचा अभिमान असावा ' हा शैक्षणिक वाक्प्रचार जिथे शाळांना लोकसहभाग मोठ्या प्रमाणात मिळतो तिथे प्रत्ययास येतो. लोकसहभाग हा केवळ आर्थिक बाबीचा नसतो तर शालेय परिसरात जे शैक्षणिक वातावरण निर्माण झालेले ते शाळा सुटल्यानंतरही कायम राहते तिथेही जाणवतो. गावातील मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी, सुशोभीकरणासाठी जसे गावकरी जागरूक असतात त्याप्रमाणे शाळेमध्ये शैक्षणिक वातावरण टिकून राहावे यासाठी नागरिकांनी लक्ष द्यावे असे लेखक आवर्जून सांगतात. लेखक असे ही म्हणतात की,' शाळा हेही एक मंदिरच आहे. येथे जिवंत

माणसे घडविली जातात.' हे वाक्य छोटेसे असले तरी फार मोठा भावार्थ त्यातून व्यक्त होतो. शाळा सुटल्यानंतर अनेक गावांमधून शाळेच्या प्रांगणात, वऱ्हांड्यात जे प्रकार घडतात ते थांबवायचे असतील तर प्रत्येक शाळेला संरक्षण भिंत हवी हे नासा येवतीकर मुद्देसूद आणि विविध उदाहरणे देऊन स्पष्ट करतात.

'पालक आपल्या पाल्याच्या शिक्षणाच्या बाबतीत जागरूक असतील तर त्यांची मुले नक्कीच हुशार असतात' पालकांच्या जागरूकतेचे महत्त्व सांगतांना गरिबांची आणि अज्ञानी पालकांची मुले ही हुशार असतात हेही लेखक आत्मविश्वासाने सांगतात. मुलांच्या शैक्षणिक अप्रगतीबाबत शिक्षकांना जबाबदार धरण्याच्या वृत्तीला येवतीकर हे युनेस्कोच्या एका अहवालाचा हवाला देऊन परस्पर उत्तर देतात.

शिक्षकांना कराव्या लागणाऱ्या अशैक्षणिक कामाबाबत नेहमीच ओरड केल्या जाते. विविध अशैक्षणिक कामांमुळे शिक्षक अध्यापनाच्या प्रक्रियेपासून दूर जात आहे, या कामांमुळे तो चिंताग्रस्त आहे. 'शिक्षक आनंदी तर मुले आनंदी' या लेखामध्ये नागोराव येवतीकर यांनी अशैक्षणिक कामांबाबत योग्य असे विवेचन केले आहे. 'ऑनलाइन कामात गुरफटलेला शिक्षक' या लेखांमध्ये शिक्षकांना कराव्या लागणाऱ्या अशैक्षणिक कामांची एक यादी लेखक वाचकांपुढे ठेवतात. त्याचबरोबर 'शिक्षक समाजाचा खरा शिल्पकार' , 'बदलत्या काळात शिक्षकाची भूमिका' अशा लेखांमधून लेखकाने शिक्षकाचे शिक्षण प्रणाली मधील महत्त्वाचे स्थान अधोरेखित केले आहे. गत् काही वर्षांपासून 'डिजिटल शाळा' हा एक अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रयोग सुरू आहे. या नवीनतम प्रयोगावर ही लेखकाने अभ्यास पूर्ण असा दृष्टीक्षेप टाकला आहे. लेखक नासा येवतीकर हे स्वतः ग्रामीण भागात अत्यंत तळमळीने कार्य करणारे शिक्षक असल्यामुळे या भागातील शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि

शैक्षणिक कार्य या सर्व घटकांची स्थिती आणि त्यावरील उपाययोजना त्यांनी विविध उदाहरणे देऊन स्पष्ट केली आहे. या लेखमालेतील प्रत्येक लेख वाचनीय आणि चिंतनीय आहे. लेखकाची भाषा अत्यंत साधी, सोपी असल्यामुळे त्यातील भावार्थ आणि लेखकाचा प्रामाणिक हेतू लक्षात येतो.

माझे मित्र श्री नागोराव येवतीकर यांच्या ' शाळा आणि शिक्षक' या ई पुस्तकाचे वाचक निश्चितच स्वागत करतील याची मला खात्री आहे. त्यांच्या आगामी लेखनास, नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमास माझ्या खूप खूप शुभेच्छा!

नागेश सू. शेवाळकर,

जेष्ठ साहित्यिक तथा सेवानिवृत्त मुख्याध्यापक

थेरगाव, पुणे - ३३.                    ९४२३१३९०७१.

*हार्दिक शुभेच्छा!!....*

नमस्कार,

मा. नागोराव सा. येवतीकर,

मु.पोस्ट येवती, जि. नांदेड.

शिक्षक, पालक , शिक्षण विभाग व या सर्वांच्या विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत असलेल्या योगदानाचा आढावा घेणाऱ्या ई पुस्तकाचे आपण प्रकाशन करत आहात.

सर्वप्रथम आपले मनःपूर्वक अभिनंदन व या समाजोपयोगी कार्यास व्यक्तिगत व समस्त काव्यानंद परिवारातर्फे भरपूर शुभेच्छा.

आपल्या या पुस्तकात आपण विद्यार्थ्यांशी निगडित विविध विषयांवर प्रकाश टाकला आहे. जसे की शिक्षण व्यवस्थेत घडलेले बदल व त्याचा शिक्षकांवर झालेला परिणाम, वाचन , लेखन व सर्व याचे विद्यार्थी जीवनात असलेलं महत्त्व. विद्यार्थ्यांच्या विकासात सर्वांगिण जबाबदारी इ.

आपले हे ई पुस्तक शिक्षण क्षेत्रात नक्कीच क्रांतिकारक असे पाऊल असेल अशी मनोकामना व्यक्त करतो आणि आपल्या पुस्तकास मनःपूर्वक शुभेच्छा देतो.

आपला नम्र,

सुनिल खंडेलवाल,

संपादक, ई काव्यानंद ,

काव्यानंद प्रतिष्ठान, पुणे

हार्दीक शुभेच्छा

शाळा आणि शिक्षक या ई बुक प्रकाशनाच्या निमीत्ताने आमच्या प्रतिभासंपन्न नासा सरांचे मनःपूर्वक अभिनंदन. नाव पाहिल्याबरोबर नासातील वैज्ञानिक संशोधकाचे स्मरण झाल्याशिवाय राहत नाही. शाळेत तनाने व मनाने समरस व समर्पित झालेला हा शिक्षक. खरोखर एवढ्या छोट्याश्या मेंदूत शाळेसाठी उपक्रमाची रेल्वेडब्याप्रमाणे रांग लावतो, राबवतो, यशस्वी करतो विद्यार्थ्यांच्या वाचन मननापासून ते थेट डिजिटल शाळेच्या निर्मितीसाठी लोकसहभागाचे महत्व जाणतो.

विद्यार्थ्यांच्या मनात राष्ट्र उभारणीची प्रेरणा रूजवतो खरोखर आपल्या या भक्तीला सलाम. "मला पुस्तक व पेन  द्या मी जगात क्रांती घडवून आणीन" हे वाक्य मनाला खूप भिडले. विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी शिक्षकच झटू शकतो शाळांमधून राबवण्यात येणा-या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांतून विद्यार्थ्यांचा विकास साधता येतो त्याना खेळाच्या माध्यमातून खिलाडुवृत्ती व मनोबल वाढवणारे धडे देता येतात व जगण्याची प्रेरणा त्यात निर्माण करता येते किती सुंदर जपलं आहे हो सर तुम्ही. मुलांना चिखलाच्या गोळयाला साजेसा आकार दिला आहे ." शिक्षक व शाळा हे नात आई व नाळ जुटलेल्या बाळासारखं आहे हेच तर सांगितलं आहे तुम्ही तुमच्या शाळा आणि शिक्षक या पुस्तकातून, मनस्वी आनंद झाला वाचताना.

शिक्षक हा समाजाचा खरा शिल्पकार आहे. शाळा हे विकासाचे केंद्र आहे हे आपले लेख वाचल्यानंतर मनस्वी पटले. आपण स्वतः हे सर्व अनुभवले व प्रत्यक्ष स्वरूपात सर्वासमोर मांडले आपले पुनश्च एकदा अभिनंदन.  आपल्या ' शाळा आणि शिक्षक ' ई बुकसाठी आणि पुढील लेखन कार्याच्या वाटचालीस आभाळभर शुभेच्छा.

स्नेहलता कुलथे,

प्राथमिक पदवीधर

के.प्रा.शा.सावरगाव

ता.माजलगाव जि.बीड

नासा येवतीकर चालता बोलता नैतिकतेचा झरा.... !!

नासा येवतीकर यांना गेल्या दोन वर्षापासून मी ओळखते. त्यांच्याशी ओळख झाली ती साहित्य समुहामुळे. गेल्या दोन वर्षापासून त्यांचं लेखन मी सातत्याने वाचत आली आहे. सामाजिक नैतिकतेची जाण ठेवून ज्या पद्धतीने ते समाजातील विविध विषय हाताळतात त्यांचं शब्दात वर्णन करणे कठीणच . समाजातील प्रत्येक घटक त्यांनी आपल्या लेखणीतून मांडलेला आहे. विशेष करून शिक्षक, विद्यार्थी, शाळा व समाज यांच्यातील ऋणानुबंध त्यांच्या लेखणीतून डोकवतांना दिसून येते. शिक्षक हे विद्यार्थ्यांना घडवणारे महत्वाचे समाजातील घटक असून त्यांनी आपल्या क्षेत्राशी प्रामाणिकपणे कार्य केले पाहिजे, अशी जाणीव ते आपल्या लेखणीतून वेळोवेळी करून देतात. समाजातील तरुणांना एक योग्य दिशा दाखविण्याचं काम नासा सरांच्या लेखणीतून सातत्याने होतं आहे. नदीच्या प्रवाहाप्रमाणे त्यांचे लेखसुद्धा आपल्या समृद्ध विचाराने निरंतर वाहत असते. त्या विचाराच्या प्रवाहातून कित्येक वाचक आपली वाचनाची तृष्णा भागवीत असतात.

रक्तदान, हुंडा, महिला अत्याचार, शाळा, विद्यार्थी, पर्यावरण, लोकसंख्या वाढ, व्यसनजनजागृती, संकृती, मानवता, गरिबी, राजकारण, समाज असे नानाविध घटकांवर समृद्ध लेखन करीत समाजाला एक नवी दिशा दाखविण्याच मौलिक कार्य ते करीत आहेत. साहित्याची सेवा करत अपार मेहनतीने ते समाजाची एक प्रकारे सेवाच करीत आहे.

शांत, सुस्वभावी, होतकरू मनमिळाऊ आणि सहनशीलतेचा झरा म्हणजे नासा सर! त्यांच्या बोलण्यातून कुणालाही एक सन्मानच मिळतो. कुणाचाही अपमान न करता त्यांना समजून घेणे हे त्यांच्या स्वभावात आहे. असे

व्यक्तिमत्व असणारे आमचे नासा सर लाखात एक आहे असं म्हणणेही वावगे ठरणार नाही.

त्यांच्या मैत्रीमुळे सहनशीलतेचे धडे मला मिळाले. आदर, नम्रता आणि नैतिकतेच ते चालतं-बोलतं झाड आहे. आज समाजाला अशा व्यक्तींची गरज असून समोरच्या पिढीला आदर्श ठरावे असे ते आहेत. अशा आमच्या कर्तव्यदक्ष, कर्तव्यतत्पर, होतकरू, प्रामाणिक व निष्ठावंत अनेकांना आदर्श ठरणाऱ्या लाडक्या नासा सरांचे ' शाळा आणि शिक्षक ' या बुक साठी मनःपूर्वक शुभेच्छा आणि त्यांचे लेखन असेच समृद्ध होत राहो हीच ईश्वरचरणी प्रार्थना करते.

प्रा. वैशाली देशमुख

साहित्य स्पंदन समूह संचालिका

ग्रामविकास कनिष्ठ महाविद्यालय, कुही, जि. नागपूर

शुभेच्छा ....!

प्राथमिक शिक्षक नागोराव सा. येवतीकर यांनी गेली दोन अडीच दशकापासून शैक्षणिक तसेच वृत्तपत्र क्षेत्रात सातत्याने नियमितपणे सामाजिक,कौटुंबिक, तसेच शैक्षणिक आदी विषयावर आधारित स्तंभलेखन करीत आहेत. त्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून घराघरात जोडले गेले आहेत. त्यांना वृत्तपत्राच्या माध्यमातून वाचण्यासाठी असो की, 'फ्रेश मॉर्निंग बुलेटीन' या माध्यमातून असो. त्यांना वाचण्यासाठी तसेच ऐकण्यासाठी लहानांपासून ते मोठ्यापर्यंत सर्वांना ओढ लागली असते. बालपणीच्या शाळेतून जी प्रेरणा आणि उर्जा मिळाली, ती आजही कायम आहे. आज ते विविध विषयांवर अभ्यासपूर्ण आणि वैचारिक लेख लिहून समाज प्रबोधनाचे कार्य करीत असतात.

गेल्या २० - २२ वर्षामध्ये त्यांनी भरपूर लेखन केले. त्यांच्याकडे पाहून अनेक कवी, साहित्यिक घडले. त्यांनी कधी चेहरा देखील बघितले नाही, अशा लोकांना फेसबुक, वाट्सअॅपच्या माध्यमातून जोडले गेले. तसेच त्यांना मोलाचे योग्य मार्गदर्शन करून घडविले. यामुळे ते प्रत्येक व्यक्तीला आपलेसे वाटतात. त्याचमुळे ना. सा. येवतीकर हे नाव शैक्षणिक तसेच वृत्तपत्राच्या क्षेत्रात सुद्धा आदरपूर्वक घेतल्या जाते. त्यांना आजपर्यंत विविध पुरस्कार मिळाले आहेत. त्यांच्या संकल्पनेतून लवकरच आपल्या सर्वांच्या हातात शाळा आणि शिक्षक हे मोलाचे ई बुक आपणास देत आहेत. त्याबद्दल त्यांच्या साहित्याचे स्वागत आणि मनःपूर्वक अभिनंदन तसेच खुप खुप शुभेच्छा..!

आपला नम्र

-राजेश जेटेवाड बरबडेकर

परिचर प्राथमिक आरोग्य केंद्र मांजरम ता.नायगांव खै. जि. नांदेड

मोबाईल ९४२०८१४०९९

************************

शुभेच्छा .....!

नासा येवतीकर शिक्षण क्षेत्रातील एक भन्नाट माणूस. असा कोणताच विभाग नाही, ज्यात त्यांना जमत नाही. सर्वच बाबतीत अष्टपैलू कामगिरी करणारे. तसा त्यांचा आणि माझा संबंध गेल्या दहा वर्षांपासून आहे मात्र गेल्या तीन वर्षात शिक्षकांना ऑनलाईन काम लावल्यापासून त्यांचा संबंध वाढला. नवीन काही शिकण्याची त्यांची वृत्ती त्यांना गप्प बसू देत नाही. ऑनलाईन कामात येणाऱ्या समस्या दूर करण्यासाठी ते माझ्या नेहमी संपर्कात आले आणि आमची मैत्री वाढली. शाळा आणि शिक्षक ह्या ई बुकच्या संदर्भात त्यांनी खूप सखोल विचार करून लेख लिहिले आहेत. सर्व लेख हे त्यांच्या अनुभवातून लिहिण्यात आलेले आहेत. लोकसहभागाशिवाय शाळेचा कायापालट होऊच शकत नाही हे आमच्या चर्चेत देखील ते सांगत असत. विद्यार्थ्यांना लहान लहान गोष्टी पटवून सांगण्यात त्यांचा हातखंडा खूप मोठा आहे. ते नेहमी म्हणतात की, शिक्षक आनंदी असेल तर मुले आनंदी राहतात. हेच त्यांच्या लेखातून वाचायला मिळते. शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांना शिक्षण मिळण्याची संधी मिळावी यासाठी त्यांची धडपड असते. इंग्रजी शाळापेक्षा सरकारी मराठी शाळा श्रेष्ठ आहेत असे नेहमी पालकांना मार्गदर्शन करतात. हे ई बुक म्हणजे चालते बोलते नासा सर होय. त्यांच्या ' शाळा आणि शिक्षक ' ई बुकला मनःपूर्वक शुभेच्छा आणि शैक्षणिक क्षेत्रात स्वागत.

- उदयकुमार शिल्लारे

तंत्रस्नेही शिक्षक, प्रा. शाळा माष्टी

ता. धर्माबाद जि. नांदेड

9673769737

शुभेच्छा

प्रति.

नागोराव येवतीकर,

आपण शैक्षणिक क्षेत्रात करत असलेले काम कौतुकास्पद आहे. आपण एक शिक्षक आहात. फक्त सकाळी दहा ते पाच शाळा केली की झाले आपले काम, अशी मानसिकता आपली नाही. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल, पालकांनी आपल्या मुलांकडे कसे लक्ष द्यावे ही तळमळ सतत आपल्या लिखाणातून व वर्तणूकीतून दिसते.

या आधी ही आपण शैक्षणिक विषयावर शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांना उपयुक्त असे ' पाऊलवाट ' हे पुस्तक प्रकाशित केले आहे.

' शाळा व शिक्षक ' या विषयावर आधारित असे शालेय विद्यार्थी, पालक व शिक्षण खात्याला ही अत्यंत उपयुक्त असे आपले ई पुस्तक प्रकाशित होत आहे ही खूप आनंदाची व अभिमानाची गोष्ट आहे.

माझ्या व साहित्य मंथनपरिवारा तर्फे आपल्या पुस्तकासाठी खूप खूप शुभेच्छा.

अरविंद कुलकर्णी, पुणे

साहित्य मंथन समूह संयोजक

शुभेच्छा ....

ना.सा. सरांविषयी लिहावे तेवढे थोडेच आहे. एक हुशार आणि समंजस व्यक्तीमत्वाचं आभाळच   आहेत ना. सा सर

आपण बहुतेक ठिकाणी जवळपास सर्वच क्षेत्रात पाहतो पुढे जाण्यासाठी चढाओढ लागलेली असते. सगळेच जण एकमेकांना मागे करून पुढे जाण्यासाठी धडपडत असतात . पण ना.सा. सर सगळयांना बरोबर घेऊन पुढे जात असतात. माझ्यासारख्या कमी शिकलेल्या अणि व्याकरणाची अपूर्ण माहिती असलेल्या व्यक्तींना सुध्दा प्रोत्साहन देण्यासाठी व्याकरणाच्या चुका दुरुस्त करून मी लिहलेले लेख वृत्तपत्रात प्रसिद्धीसाठी देतात. त्यांच्यामुळे अडगळीत असलेले माझे साहित्य वृत्तपत्रात प्रसिद्ध झाले आहेत. खरंच सर्वांनी प्रगती करावी असे त्यांना मनापासून वाटते. वैशाली ताईंनी अगदी बरोबर म्हटले आहे ना.सा. सर म्हणजे माणूसकीचा वाहता झरा. त्यांचे साहित्य लिखाण खुप आशययुक्त आणि समाज प्रबोधनाचे कार्य करते .

शाळा आणि शिक्षक ई बुकसाठी आणि त्यांच्या पुढिल साहित्यिक वाटचालीसाठी मनापासून खुप खुप शुभेच्छा

आणि त्यांचे खुप खुप आभार

सौ. सुवर्णा सोनवणे चाळीसगाव

कहाणी एका पुस्तकाची ......

नासा म्हणजे मी वाचलेले एक शिस्तप्रिय पुस्तक. सरकारने मंजुरी दिलेल्या पुस्तकापेक्षा हे पुस्तक फारच निराळं आणि अनमोल.

नासा बंधुचे कौतुक शब्दात करणे कठीणच, सहज एकदा त्या व्यक्तिमत्वावर दोन वर्षांपूर्वी लिहिण्याचा मला योग आला. मी तीन वर्षाआधी त्यांच्या साहित्यिक ग्रुपमुळे जोडल्या गेले. कुठल्याही विषयावर उत्कृष्टपद्धतीने लेखन करणे ही त्यांची किमया, कुणालाही वेड लावून जाते. त्यांचे काही जिवलग मित्र सांगतात की, त्यांच्या डोक्यात नेहमी विषयाची शोध मोहीम चालू असते. विषय सापडला की त्यावर अगदी अनुभवाच्या बळावर काही क्षणात ते लिहून काढतात. साहित्याच्या ग्रुप वर ते स्वतः लेखनाची स्पर्धा घ्यायचे आणि इतरांना लिहिण्यास स्फूर्ती द्यायचे. याच माध्यमातून त्यांनी माझ्यासारख्या अनेकांना नकळत घडविले आहे.

कोणतीही समस्या असेल त्यावर ते उपाय जरूर शोधून काढतात आणि सर्वांना नेहमी मदत करतात, असे हे नासाबंधु.

मानाचा खरा मुजरा त्यांच्या मातोश्रीला आणि त्यांच्या अर्धांगिनीला द्यावा वाटतो. एकीने घडवले आहे तर एकीने साथ देऊन त्यांना उभे केले आहे. असे हे अष्टपैलू व्यक्तिमत्व असलेले नासा सर कित्येकजणांच्या मनावर आज राज्य करीत आहेत. त्यांचे आतापर्यंत 300 हुन अधिक लेख विविध वृत्तपत्र, साप्ताहिक, आणि मासिकातून प्रकाशित झालेले आहेत. प्रत्येक मुलांना, साहित्यिकांना प्रेरणात्मक असणारे ह्या नासाबंधुला आळस नावाचा आजार कधीच शिवलेला नाही आणि भविष्यात शिवणार देखील नाही. स्वभावाला औषध असतं हा सिद्धांत आमचे नासाबंधु सिद्ध करून दाखवितील याचा मला विश्वास आहे.

जीवन जगण्याचा दृष्टिकोनामुळे प्रत्येकजण प्रभावित होतात,  असेच व्यक्ती विद्यार्थी संस्कारित करून देश घडवू शकतात .एक दिवस नासा नावाचे पुस्तक प्रकाशित झाल्याचे बघायला मिळेल अशी आशा वाटते. शाळा आणि शिक्षक या पाचव्या ई बुक साठी मनःपूर्वक शुभेच्छा....!

सर्वांचे दिशादर्शक असे नासाबंधु यांच्या पुढील लेखनास अजून बळ मिळो हीच प्रार्थना.आमच्या अखंड-अनंत शुभेच्छा तुमच्या पाठीशी असणारच. दीर्घायुषी-यशोदिप्त भवः.......

वृषाली वानखडे

तनिष्का सदस्य, अमरावती..

साहित्य स्पंदन समूह संचालिका

**************************

शुभेच्छा

सप्रेम नमस्कार,

आपण पालक, आजची शिक्षण व्यवस्था, ई लर्निंगचे शिक्षकांपुढील व विद्यार्थ्यांपुढील आव्हान, पालकांची व शिक्षकांची भुमिका आणि व्यवस्थापन व राज्य सरकारची शैक्षणिक धोरणे,समाजाची मानसिकता, प्रसार माध्यमांची भुमिका विचारात घेऊन भावी पिढी ही आव्हाने कशी समर्थपणे पेलू शकेल याचा सारासार विचार करूनच आपले लिखाण हे झालेले असावे असा माझा कयास आहे.

आपण एक कृतिशील, प्रयोगशील व शिक्षकी पेशाचे महत्व जाणणारे शिक्षक आहात. आपण एक उत्कृष्ट वक्ता, लेखक व कवी आहात. आपण शिक्षण क्षेत्रातील एक जाणकार व्यक्तीमत्व आहात. मुलांच्या मनावर अधिराज्य गाजविणे हा आपला आवडता छंद आहे. प्राथमिक शिक्षकाचे भावी पिढी घडविण्यातील योगदान काय असू शकते हे आपण समजून आहात. यातच आपले मोठेपण दडलेले आहे. यासाठीच आपण ई पुस्तकाचे लेखन व प्रकाशन करून समाजातील लोकांसमोर व शासन व्यवस्थे समोर एक विकल्प ठेवू इच्छिता.

आपल्या या ज्ञानदानाच्या कार्यास माझ्या मनःपुर्वक शुभेच्छा तसेच ई-बुक प्रकाशनाबद्दल आपले मनस्वी अभिनंदन. आपल्या हातून ज्ञानदानाचे असेच कार्य घडत राहो हीच शुभकामना. माझ्यासप्रेम नमस्कार,

आपण पालक, आजची शिक्षण व्यवस्था, ई लर्निंगचे शिक्षकां पुढील व विद्यार्थ्यांपुढील  आव्हान ,पालकांची व शिक्षकांची भुमिका आणि व्यवस्थापन व राज्य सरकारची शैक्षणीक धोरणे,समाजाची मानसिकता,प्रसार माध्यमांची भुमिका

विचारात घेऊन भावी पिढी ही आव्हाने कशी  समर्थपणे पेलू  शकेल याचा सारासार विचार करूनच आपले लिखाण हे झालेले असावे असा माझा कयास आहे.

आपण एक कृतिशील, प्रयोगशील व शिक्षकी पेशाचे महत्व जाणणारे शिक्षक आहात. आपण एक उत्कृष्ट वक्ता, लेखक व कवी आहात. आपण शिक्षण क्षेत्रातील एक जाणकार व्यक्तीमत्व आहात. मुलांच्या  मनावर अधिराज्य गाजवीणे हा आपला आवडता छंद आहे.प्राथमिक शिक्षकाचे भावी पिढी घडविण्यातील योगदान काय असू शकते हे आपण समजून आहात. यातच आपले मोठेपण दडलेले आहे. यासाठीच आपण ई पुस्तकाचे लेखन व प्रकाशन करून समाजातील लोकांसमोर व शासनव्यवस्थेसमोर  एक विकल्प ठेवू इच्छिता.

आपल्या या ज्ञानदानाच्या कार्यास माझ्या मनःपुर्वक शुभेच्छा.तसेच ई-बुक प्रकाशनाबद्दल आपले मनस्वी अभिनंदन. आपल्या हातून ज्ञानदानाचे असेच कार्य घडत राहो हीच शुभकामना.

आपला परमस्नेही


मिलिंद मधुकरराव गड्डमवार

' मधु कुंज ' आसिफाबाद रोड

तह- राजुरा जिल्हा-चंद्रपूर

भ्र.क्र ९५११२१५२००

अनुक्रम


- कॉपी म्हणजे एक कलंक
- *आयुष्यातील महत्वपूर्ण वळण...!*
- *सांस्कृतिक कार्यक्रमातून विद्यार्थ्यांचा विकास*
- लोकसहभागातून शाळा विकास
- लिहिण्याला पर्याय नाही
- प्रत्येक शाळेला संरक्षणभिंत हवे
- एकच ध्यास ; वाचन विकास
- मुलांच्या प्रगतीसाठी .........!
- राष्ट्रगीत आणि राष्ट्रभक्ती
- शिक्षक आनंदी तर मुले आनंदी*
- वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने.......!*
- ऑनलाइन कामात गुरफटलेला शिक्षक
- शाळा हेच विकासाचे केंद्र*
- शिक्षक : समाजाचा खरा शिल्पकार
- बदलत्या काळात शिक्षकांची भूमिका*
- विद्यार्थी अप्रगत का राहतो ?
- ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षण
- मोबाईल डिजिटल शाळा

# कॉपी म्हणजे एक कलंक

कॉपी करणे म्हणजे नकला करणे असा सारासार अर्थ घेतला जातो. परीक्षेचा काळ आला की कॉपी हा शब्द कानावर पडतो. वर्षभर अभ्यास न करणारे विद्यार्थी परीक्षेच्या काळात कॉपी करण्याचा विचार करतात. नकला मारण्यासाठी ही मुले नाना प्रकारच्या क्लृप्त्या किंवा योजना तयार करतात. नकला मारणे म्हणजे एक प्रकारे चोरी करण्यासारखेच आहे, तो सुद्धा एक गुन्हाच आहे. शालेय विद्यार्थ्यांचे कामच असते अभ्यास करणे. तेच काम जर तो यशस्वीपणे पूर्ण केला नाही तर भविष्यात त्याला त्याचे फळ भोगावेच लागतात. गेलेली वेळ कधीच पुन्हा परत मिळत नाही म्हणून वेळेचा सदुपयोग जो करतो तो जीवनात कधीच अयशस्वी होत नाही आणि त्याला कॉप्या करण्याची देखील गरज भासत नाही. वेळ निघून गेल्यावर पश्चाताप करत बसण्यात काही अर्थ नाही. आपल्यासोबत शिकलेले मित्र जेव्हा अधिकारी किंवा कर्मचारी म्हणून आपल्यासमोर येतात, त्यावेळी आपल्या तोंडून सहज शब्द बाहेर पडतात की, मी त्यावेळी शिक्षकांच्या बोलण्याकडे किंवा शिकवण्याकडे लक्ष दिलं नाही अन्यथा मी सुद्धा काहीतरी बनलो असतो. शिक्षकांच्या शिकवण्याकडे किंवा त्यांच्या बोलण्याकडे लक्ष न देणारे, वर्गात अनुपस्थित असणारे आणि शिक्षकाने दिलेले कार्य पूर्ण न करणारे विद्यार्थी या कॉप्याला बळी पडतात. कॉप्या करून एकवेळ या पुस्तकी अभ्यासक्रमातून बाहेर पडाल पण आयुष्याच्या परीक्षेत कसे उत्तीर्ण व्हाल? एखादा विद्यार्थी कॉप्या करून जर डॉक्टर झाला तर एखादा रुग्ण दगावले, एखादा विद्यार्थी कॉप्या करून जर इंजिनियर बनला तर धरण कोसळून शे दोनशे लोक मरतील पण एखादा विद्यार्थी

जर कॉप्या करून शिक्षक झाला तर त्याच्या हाताखालच्या किती पिढ्या बरबाद होतात? याचा कधी विचार केला आहे काय? परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की, कॉप्या करून शिक्षण क्षेत्रात येणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस भरमसाठ वाढत आहे. पैशांच्या बळावर जो तो शिक्षक बनत आहे, हे पुढील भविष्यासाठी नक्कीच चांगली बाब नाही.दहावी व बारावीच्या परीक्षेत फार मोठ्या प्रमाणावर कॉप्यांचे प्रमाण वाढलेले दिसून येते. कारण हे दोन वर्ग आयुष्यातील महत्त्वाचे वळण देणारे वर्ग असतात. पण जास्तीत जास्त मार्क मिळवायचे म्हणून विद्यार्थ्यांसोबत पालक देखील गैरमार्गाचा अवलंब करतात. नुकतेच बारावीच्या परीक्षेला प्रारंभ झाले आणि पहिल्याच दिवशी 12वीचा इंग्रजीचा पेपर परीक्षा सुरू होण्यापूर्वी सोशल मीडियावर व्हायरल झाला. याला काय म्हणावे? लोकांची नीतिमत्ता दिवसेंदिवस खालावत चालली आहे. या कॉप्यावर बंदी यावी आणि कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा संपन्न व्हावेत म्हणून नांदेडचे तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकर परदेशी यांनी सन 2010 मध्ये नांदेड जिल्ह्यात कॉपीमुक्त परीक्षेचे आयोजन केले. त्यामुळे त्यावर्षी जिल्ह्याचा निकाल सर्वात कमी लागला. पण परीक्षेला लागलेली कीड बाजूला करता आले हे महत्त्वाचे आहे. यामुळे नकलावर अवलंबून न राहता मुले अभ्यास करू लागली. एक परिणाम असा झाला की जो निकाल लागत होता तो पूर्ण सत्य होता. त्यात फुगीरपणा नव्हता. त्याचबरोबर परीक्षेच्या काळात होणारा पूर्ण सावळागोंधळ बंद झाला होता. या परीक्षावर अनेक जणांची पोटे अवलंबून होते, झेरॉक्सवाले, नकला लिहिणारे, पुरवठा करणारे, शाळेत असलेली शिपाई, शिक्षक, संरक्षणासाठी असलेले पोलीस, हॉकर्स, एवढेच काय हॉलमध्ये पाणी देणारे वाटर बॉय यांची देखील चलती राहत होती. या काळात शहरातील सर्व धाबे, बियरबार आणि परमिट रूम हाऊस फुल्ल राहत असे. पण हे सारे बंद झाले या कॉपीमुक्त अभियानामुळे. कॉप्या करून भरपूर गुण घेतलेला विद्यार्थी स्पर्धा परीक्षेच्या यादीत सर्वात खाली असायचा. प्रत्येक ठिकाणी कॉपी कामाला येत

नाही. त्यामुळे जीवनात यशस्वी होण्यासाठी कॉफी करणे हा योग्य मार्ग नाही ते एक प्रकारचे बांडगूळ आहे. म्हणून प्रत्येक विद्यार्थ्याने याविषयी गंभीरतेने विचार करून एक वेळा नापास झाले तरी चालेल पण कॉपी करणार नाही असे ठरविणे आवश्यक आहे. कॉप्यामुळे अभ्यास केलेल्या मुलांचे खूप नुकसान होते. अपार मेहनत करून रात्रंदिवस अभ्यास केलेल्या मुलांना कमी गुण मिळतात आणि कॉप्या केलेल्या मुलं जास्त गुण मिळतात. अभ्यास करणारा देखील पुढे अभ्यास करीत नाही. पर्यवेक्षक मंडळीनी देखील जरासा कडकपणाची  भूमिका घेतली तर या कॉपी प्रकरणाला निश्चितच आळा बसू शकेल असे वाटते.

## *आयुष्यातील महत्वपूर्ण वळण...!*

आज आपण आयुष्याच्या अशा वळणावर आहोत. वळण जसे घ्याल तसे आपले जीवन वळणार आहे. आपण वळणच घ्यायचे नाही असे ठरविले तर आपण यश मिळवू शकणार नाही.  शिक्षण हे एक असे माध्यम आहे ज्यामुळे आपल्या आयुष्याला अनेक वळण घेता येऊ शकतात. महात्मा ज्योतिबा फुले यांनी शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही असे म्हटले तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा असा मोलाचा संदेश दिला. महात्मा गांधीजी जीवन शिक्षणावर भर देत असत. भारतात सर्वच जण शिक्षणाचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी आयुष्यभर कष्ट घेतले. कारण भारत देशाला प्रगतीपथावर जर न्यायचे असेल तर देशातील सर्व लोक शिकले पाहिजेत.

आपण आज एका महत्त्वपूर्ण अशा वळणावर आलो आहोत. म्हणून आज आपण आपली ध्येय आणि त्यासाठीचे नियोजन करणे आवश्यक आहे. नियोजन न करता काम करू लागलो तर त्यात यश मिळेल ही कदाचित परंतु ते यश जीवन सुधारणा करण्यात बदल करता येणार नाही. महात्मा फुले असो वा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव प्रत्येकजण का घेतात? याचा आपण कधी विचार केला आहे काय? महात्मा फुले यांनी मुलींसाठी पहिली शाळा काढली तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारत देशाची घटना लिहीली. म्हणून प्रत्येकजण त्यांचे आज स्मरण करतात, हे तर सत्य आहेच. त्याचबरोबर त्यांनी केलेले वाचन चिंतन आणि लेखन यामुळे ते आजही लोकांच्या हृदयात जिवंत आहेत. रात्रंदिवस पुस्तकाचे वाचन करणे, त्यावर चिंतन करणे आणि लोकांचा, समाजाचा पर्यायाने देशाचा विकास व्हावा यासाठी लेखन करणे असे फार मोठे कार्य त्यांनी केले.

आपणाला सुद्धा जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर वाचन चिंतन आणि लेखन या तीन गोष्टी वर जास्त भर दिला पाहिजे. वरील तीन गोष्टी जीवनात मिळवायचे असेल तर त्यासाठी आपल्याजवळ हवी कठोर मेहनत आणि अविरत काम करण्याची इच्छा. याशिवाय आपण काहीच मिळवू शकत नाही. यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनचरित्र डोळयासमोर ठेवणे आवश्यक आहे. म्युनिसिपाल्टिच्या दिव्याच्या उजेडात त्यांनी अभ्यास केला. ग्रंथालयातील वेळ वाचविण्यासाठी आणि जास्तीचा वेळ वाचन करता यावे यासाठी ग्रंथपालांचे डोळे चुकवून पाव खायचे पण पुस्तक वाचायचे. वाचाल तर वाचाल या उक्तीची ओळख त्यांच्या जीवनचरित्रातून दिसून येते. आठरा तास अभ्यास करण्याची क्षमता त्यांच्यामध्ये होती म्हणूनच ते भारताची घटना रात्रंदिवस कष्ट करून लिहू शकले.

दहावी आणि बारावीचे वर्ग म्हणजे अत्यंत महत्वाचे वर्ष असते. दिवस-रात्र एक करून अभ्यास केल्याने यश मिळते का? तर याचे नाही असे उत्तर मिळते. कामात अविरतपणा असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. समर्थ रामदास स्वामी यांनी म्हटल्याप्रमाणे आधी कष्ट मग फळ । कष्टाविना सर्व निष्फळ ।। त्यामुळे देरे हरी पलंगावरी ही वृत्ती आपण सोडून द्यायला हवे. कष्ट केल्यावर यश मिळणारच जर यदा कदाचित यश मिळाले नाही तर नाउमेद न होता, पुन्हा जोमाने काम करावे. सचिन तेंडुलकर जेव्हा शून्यावर बाद होत असे तेही पहिल्याच चेंडूवर, तेव्हा स्वतः आत्मपरीक्षण करून सरावावर भर देऊन पुढील सामन्यात शतक ठोकत असे. असेच काही काम आपल्याला करायचे आहे. नाउमेद व्हायचे नाही, खचून जायचे नाही, भविष्यात अनेक संकटांना तोंड द्यायचे आहे, त्याची ही पूर्वतयारी समजून कार्य करावे.

## *सांस्कृतिक कार्यक्रमातून विद्यार्थ्यांचा विकास*

26 जानेवारी अर्थात प्रजासत्ताक दिनाचा दिवस जसे जसे जवळ येत जाते तसे तसे शाळेतील वातावरण बदलू लागते. हिवाळयाच्या दिवसात बाहेर गुलाबी थंडी असते आणि मनात विचारांची गर्दी. सर्वत्र प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध कार्यक्रमाच्या बाबतीत नियोजन आणि आयोजन चालू असते. विविध प्रकारच्या खेळांच्या स्पर्धा घेतल्या जातात. त्यामुळे मुलांची चार दिवस खूपच मजा असते. हे चार दिवस दप्तर मुक्त शाळा असते. कधी ही न बोलणारी मुले या वेळी व्यक्त होताना दिसतात. अभ्यासात मागे असलेली बरीच मुले विविध प्रकारच्या स्पर्धेत प्राविण्य मिळवितात. पुस्तकांच्या जगात कदाचित ते कमी पडत असतील मात्र अन्य कामात त्यांच्या कार्याला खरोखर तोड नसते याची प्रचिती या क्रीडास्पर्धेच्या माध्यमातून दिसून येते. मुलांमध्ये असलेला सांघिकपणा, खिळाडूवृत्ती, पराजय पचविण्याची शक्ती आणि एकमेकांबद्दलचा आदर अश्या या स्पर्धेतून ठळकपणे दिसून येतात. बक्षिसांच्या आशेने न खेळता एक आनंद मिळावा या उद्देशाने खेळविली गेलेले खेळ मुलांच्या अनेक पैलूला स्पर्श करून जातात. म्हणून निदान वर्षातून एकदा का होईना अश्या या खेळाचे आयोजन शाळांनी करायलाच हवे. ज्या शाळा याचे सुंदर नियोजन तयार करतात त्या शाळेतील मुले आनंदी राहतात.

याच प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने बहुतांश शाळा सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करतात. ज्यात मुलांच्या विविध कलागुणांचा आविष्कार आपणास पाहायला मिळतो. व्यक्ती तितक्या प्रकृती या उक्तीनुसार प्रत्येक मूल भिन्न असतो. प्रत्येकाच्या अंगी एक वेगळी कला असते. कोणी छान नृत्य करू शकतो, तर कोणी गायन छान पैकी करू शकतो, कुणी छान बोलू शकतो तर कुणी छान निवेदन करू शकतो तर कुणी एखादा लोकांना खूप हसवू शकतो. प्रत्येक मुलांच्या अंगी

असललेले किंवा सुप्त असलेल्या गुणांची पारख सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून करता येते. पुस्तकी ज्ञानात हुशार नसलेला एखादा या कार्यक्रमातून प्रकाशज्योतात येऊ शकतो. गरज आहे ती त्या विद्यार्थ्याला संधी देण्याची. मिळालेल्या संधीचे काही मुले नक्की सोने करतात. आजपर्यंत जे कोणी मोठे लेखक, कवी, नाटककार, संगीतकार, हिरो किंवा हिरॉईन झाले आहेत त्या सर्वांची पाळेमुळे या सांस्कृतिक कार्यक्रमात येऊन थांबतात. म्हणून शाळेच्या संपूर्ण नियोजनात सांस्कृतिक कार्यक्रम एक मैलाचा दगड ठरतो. ज्यातून मुलांना स्वतःला अभिव्यक्त होण्याची संधी मिळते. वास्तविक पाहता जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने यात डोळस दृष्टीने लक्ष देऊन जिल्हास्तरीय स्पर्धेचे नियोजन केल्यास गाव पातळीवरील एखादा कलाकार जिल्हा पातळीवर चमकू शकतो. मात्र शाळेतील सांस्कृतिक कार्यक्रम शाळेच्या स्तरावरच थांबतात त्यामुळे याना योग्य प्रसिद्धी मिळत नाही. याचे सुंदर असे नियोजन केल्यास यातून फलनिष्पत्ती नक्की मिळेल असे वाटते. खेदाने एक बाब असे ही दिसून येते की सांस्कृतिक कार्यक्रमाच्या नावाखाली खालच्या स्तराची गाणे निवडली जातात आणि त्यावर मुलांकडून डान्स करवून घेतले जाते. शिला की जवानी असो वा झेंडू बाम गीत अश्या या गीतावर मुलांकडून नृत्य करवून घेणे योग्य नाही. त्याऐवजी देशभक्तीवर आधारित गीते, कृतीयुक्त गीते, महाराष्ट्र गौरव गीत, लोकगीते यांचा समावेश करून कार्यक्रम केल्यास ते मुलांवर योग्य संस्कार करतील. त्यामुळे शाळाप्रमुखांनी या बाबीकडे कटाक्षानं लक्ष देऊन असे चांगले गीत निवडावे म्हणजे आपल्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे हसे होणार नाही. शाळा लहान असो वा मोठी प्रत्येक शाळांनी प्रजसत्ताक दिनानिमित्त अश्या या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणे आवश्यक आहे कारण अश्या याच माध्यमातून विद्यार्थी म्हणजे उद्याचा भारत घडतो.

# लोकसहभागातून शाळा विकास

शाळा ही गावातील सर्वासाठी एक आधार असते. प्रत्येक शाळेला ही गावाचा आधार खुप महत्वाचा असतो. जेथे हे दोन एकमेकाच्या हातात हात घालून चालतात तेथे शाळेची आणि गावाची प्रगती लक्षणीय असते, यात शंका नाही. गाव तेथे सरकारी शाळा ह्या धोरणानुसार आज राज्यातील प्रत्येक गावात कमीत कमी चौथ्या वर्गापर्यंतचे शिक्षण मिळण्याची सुविधा शासनाने निर्माण केले आहे. शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 अन्वये राज्यातील सहा ते चौदा वयोगटातील प्रत्येक बालकांस मोफत आणि सक्तीचे शिक्षण देणे बंधनकारक करण्यात आले आहे त्यामुळे प्रत्येक गावात निदान दोन खोलीचे दोन शिक्षकी सरकारी शाळा अस्तित्वात आहे. ह्या शाळेला शासनाकडून वेगवेगळे अनुदान मिळतात, मात्र ते फारच तूटपूंजी ठरतात आणि त्यासाठी गावातील लोकांचा लोकसहभाग असणे आवश्यक आहे असे वाटते. लोकसहभाग का असावा? हे ही महत्वाचे आहे. जर एखाद्या वस्तुचा भागीदार मी असेन तर त्याची काळजी योग्य प्रकारे घेतली जाते. तसे पाहिले तर शाळा ही गाववाल्यासाठी सरकारी मालमत्ता असते. त्याचा ते हवा तसा वापर करू शकतात. कोणी शाळेत लग्न लावतात तर कोणी लहान सहान जेवण्याचे कार्यक्रम शाळेत उरकुन घेतात. गावातील मुलांसाठी खेळण्याचे खुले मैदान म्हणजे शाळा. सायंकाळी निसर्ग रम्य आणि शांत वातावरणाच्या वेळी काही मद्यपी मंडळी सुद्धा याच शाळेचा आधार घेतात. काही लोक आपला पिण्याचा कार्यक्रम शांतपणे करून तेथे कसलाही गोंधळ न करता निघुन जातात तर काही महाभाग दारूची बाटली तेथेच फोडून काचेचा सडा टाकतात. अर्थात त्याचा त्रास गुरुजींना जेवढा होतो तेवढाच शाळेत शिकणारी मुले

म्हणजे गावकऱ्याचीच मुले त्यांना त्रास होतो. काही मंडळी शाळेच्या स्वच्छतागृहात घाण करतात. त्याची नासधुस करतात. गुटखा आणि तंबाखू थुंकुन शाळेच्या भिंती रंगवून टाकतात. शाळेच्या बाहेरील भिंतीवर काही चित्र किंवा नकाशे काढलेले असतील तर त्यावर चित्रविचित्र रेषा ओढतात, शब्दाचे खाडाखोड करून अनर्थ करतात. हे सर्व कश्यामुळे घडते तर या शाळेत माझा एक ही टक्का सहभाग नाही त्यातल्या त्यात आर्थिक सहभाग नाही. म्हणून काही संबंध नाही, असे वागतो. तेच जर गावकऱ्याचा थोडा जरी सहभागी झाला तर त्याला त्याची काळजी वाटते. म्हणून लोकसहभाग आवश्यक आहे. राज्यात सर्वत्र डिजिटल शाळेचे वारे वाहत आहेत. खाजगी शाळेला ही लाजवेल अश्या पध्दतीने सरकारी शाळा आपले रूप बदलत आहेत. आज कित्येक शाळा रंगरंगोटीने सजून मुलांना आकर्षित करीत आहेत. बऱ्याच शाळेत आधुनिक तंत्रज्ञान पोहोचले असुन डिजिटलच्या माध्यमातून मुलांना नवनवीन माहिती दिली जात आहे. शाळेचे हे रूप बदलण्यासाठी सर्वांची मोलाची मदत मिळत आहे, हे विशेष. शाळेच्या या बदलत्या स्वरूपात मुख्याध्यापक, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आणि त्यांचे सहकारी, सरपंच आणि ग्रामपंचायत तसेच त्या शाळेत शिक्षण घेतलेले नागरिक व गावकरी या सर्वाच्या आर्थिक सहकार्य लाखमोलाचे आहे. ग्रामपंचायतीकडून चौदाव्या वित्त आयोगतील 20 टक्के रक्कम शाळेला मिळत असल्यामुळे शाळेला अजून चांगला हातभार लागत आहे. या लोकसहभागामुळे गावातील प्रत्येक लोकांचा शाळेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदललेला आहे. त्यामुळे आज गावातील शाळा म्हणजे सरकारी मालमत्ता वाटत नसून स्वतःची शाळा वाटत आहे. आपल्या मनात शाळेविषयी प्रेम आणि आपुलकी निर्माण व्हावे या उद्देश्याने लोकसहभागाची खरी गरज आहे. गावातील एखादा श्रीमंत व्यक्ती भरपूर पैसा देऊन शाळेचा कायापालट करू शकतो, मात्र तसे न करता लोकवर्गणी गोळा करून हे कार्य करायचे आहे. ज्या गावातील शाळा अजुन डिजिटल झाले नाहीत किंवा शाळेच्या भिंती बोलक्या

झाल्या नाहीत त्या गावातील सर्व यंत्रणा एकदा एकत्र येऊन यावर विचार करणे आवश्यक आहे. शाळा चालविणे हे सरकारचे काम आहे. त्यासाठी मी का खर्च करावा? ही मानसिकता दूर करून आपणास जेवढे जमेल तेवढे आर्थिक सहकार्य केल्यास प्रत्येक गावातील शाळेचा बाह्यांग आणि अंतरंग बदलण्यास वेळ लागणार नाही. सरकारी शाळेची स्थिती आज खुप वाईट आहे आणि त्या शाळेला गतवैभव मिळवून देण्याची सर्वस्वी जबाबदारी एक नागरिक म्हणून आपली आहे. गावात एखादे मंदीर असेल तर त्यांच्या सुंदरतेसाठी आणि विकासासाठी दरवर्षी काही ना काही रक्कम वर्गणीच्या स्वरुपात गोळा केली जाते. भंडारा केला जातो. त्यासाठी वर्गणी जमा केल्या जाते. तर मग शाळा हे तर विद्येचे मंदीर आहे. येथे जिवंत माणसे घडविले जातात. येथून एक सुसंस्कारित पिढी बाहेर पडली तर गावाचा चांगला विकास होऊ शकतो. आजची मुले ही उद्याची आधारस्तंभ आहेत याची सर्व प्रथम जाणीव व्हायला हवे. मुख्याध्यापक आणि शिक्षक मंडळीनी शाळेसाठी प्रयत्न करायचेच आहे आणि ते करणारच. त्या शाळेत शिकून मोठ्या पदावर काम करणाऱ्या गावकऱ्यानी एकत्र येऊन शाळेला काही आर्थिक किंवा वस्तुच्या स्वरुपात मदत करू शकतात. अनेक ठिकाणी याचे उदाहरण वाचण्यात येत आहेत ती चांगली बाब आहे. असेच प्रयत्न प्रत्येक गावागावात व्हायला पाहिजे. त्याचसोबत गावातील प्रत्येक व्यक्ती जर प्रयत्न केले आणि धडपड केली तर सरकारी शाळेची प्रगती नक्कीच लक्षणीय होईल यात तिळमात्र शंका नाही. काही लोक विचार करतात की मी शाळेला काय मदत करू शकतो. आपल्या जवळ असलेली कला मुलांना बरीच काही माहिती देऊ शकते. गावात तबला व पेटी वाजविणारे भजनी मंडळ मधील अनेक लोक असतात. त्यांनी ती कला विद्यार्थ्यांना फावल्या वेळात शिकविण्याचा प्रयत्न केल्यास आपलीच मुले त्यात निपुण होतील. मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी देखील आपली कल्पकता वापरून गावातील कामगार मंडळीचा कार्यक्रम घेऊन मुलांना त्याची माहिती करून द्यावी. गावात रिकामटेकडे होऊन गावभर फिरणारे तरुण-तरुणी यांनी महिन्यातील एक दिवस शाळेला समर्पित केल्यास शाळेला नक्कीच

आधार होईल. गावातील चिमुकल्या मुलासोबत कधी गप्पा मारल्या आहेत काय? जर आपले उत्तर नाही असेल तर एकदा त्यांच्या सोबत गप्पा मारुन बघा. खुप आनंद मिळेल, जे की कुठे ही मिळणार नाही. मुख्याध्यापक, शिक्षक, शाळा, प्रशासन किंवा इतरांना दोष देताना एकदा फक्त मदतीचा हात पुढे करा आणि बघा शाळेची प्रगती कशी वेगाने होते. शाळेतील प्रत्येक घटकाची मग आपणास अभिमान वाटू लागेल. तेंव्हा चला तर आपल्या गावातील शाळेला भरपूर लोकसहभाग मिळवून देऊ आणि शाळेची सर्व बाजूनी प्रगती करण्याचा प्रयत्न करू.

# लिहिण्याला पर्याय नाही

कोणत्याही भाषा विकासातील सर्वात शेवटचे आणि अत्यंत महत्वाचा टप्पा म्हणजे लेखन क्रिया. भाषा विकासात श्रवण, भाषण आणि वाचन या तीन मूलभूत क्रियेनंतर येणाऱ्या लेखन क्रियेकडे सर्वाचेच लक्ष असते. कारण लेखन प्रक्रियेतून आपली माहिती दीर्घकाळ जतन करू शकतो. अभ्यासासाठी देखील त्या लेखी साहित्याचा वापर करता येतो. म्हणून त्यास खुप महत्त्व दिल्या जाते. ज्यावेळी कागदाचा शोध लागला नव्हता त्यावेळी लोक काय करत असत? झाडांच्या साली किंवा पानावर काठीद्वारे रेघोटया मारुन लिहिले जायचे. त्याही पूर्वी एका व्यक्ती कडून दुसऱ्या व्यक्तीकडे माहिती मुखोद्गत पध्दतीने दिल्या जायची. गुरुकुल पध्दतीमध्ये गुरुच्या मुखातून निघालेली प्रत्येक माहिती, ज्ञान लक्ष देऊन ऐकण्याशिवाय पर्याय नव्हता. वनस्पतीच्या अर्कापासून रंग तयार करणे आणि टाकद्वारे लिहिण्याची पद्धत पूर्वीच्या काळी दिसून येत होत्या. जसे जसे काळ बदलत गेले तसे तसे लेखन कला देखील विकसित होत गेली. छत्रपती शिवाजी महाराजाच्या काळातील आज्ञापत्र जर पाहिले तर आपणास लक्षात येईल की लेखनास किती महत्त्व आहे ते. संत रामदास स्वामी यांनी तर लिहिण्याच्या बाबतीत म्हटले आहे की दिसामाजी काही तरी लिहावे. कारण सौ बका एक लिखा सारखेच असते. काही ठिकाणी वारंवार बोलून फायदा होत नसतो किंवा समस्या सूटत नाही त्या ठिकाणी एखादे कागद लिहून पाठवले की चुटकीसरशी काम पूर्ण होते. ज्यास लेखणीची किंमत माहित आहे तो लेखणीला कधीच दूर करत नाही. वर्षभर कलेल्या अभ्यासाची लेखी परिक्षेच्या माध्यमातून परिक्षण होते. त्यासाठी लिहिणे आवश्यक आहे. वाचन आणि लेखन ह्या एकमेकाच्या संगतीने राहत

असतात. जो चांगल्या प्रकारे वाचन करू शकतो तो उत्तम प्रकारे लेखन करू शकतो. वाचन केल्यामुळे आपल्या जवळ त्या भाषेची शब्दसंपत्ती वाढू लगाते शब्दाची साथ असल्याशिवाय आपल्याला काय व्यक्त करायचे आहे ते व्यक्त करुच शकत नाही. संगणकच्या युगात लिहिणे कमी होत आहे असे जरी वाटत असले तरी लिहिण्याला अजुन तरी पर्याय उपलब्ध नाही. शासन किती ही पेपरलेस कारभार करण्याची संकल्पना केली तरी कागद आणि लिहिणे क्रमप्राप्त आहे. वास्तविक पाहता ज्याचे सुंदर अक्षरात लेखन करण्याची कला आहे त्यास साहित्य क्षेत्रात मानाचे स्थान आहे. अक्षरांच्या नियमानुसार जे लेखन करतात त्यास वळणदार अक्षर संबोधिले जाते. प्राथमिक वर्गापासून मुलांच्या लेखानाकडे लक्ष दिल्यास लेखन सुधारणा होऊ शकते. मात्र आजच्या धकाधकीच्या जीवनात मुलांच्या अभ्यासाकडे लक्ष दिले जाते मात्र लेखनाकडे म्हणावे तेवढे लक्ष दिले जात नाही. लेखनाचे प्रामुख्याने दोन प्रकार दिसून येतात. पहिला प्रकार म्हणजे अनुलेखन, ज्यास पाहून लिहिणे असे म्हटले जाते. प्राथमिक वर्गात सहसा अनुलेखनाकडे लक्ष द्यायला हवे. अनुलेखन करताना मुले प्रत्येक अक्षर कश्या पद्धतीने लिहितो याकडे लक्ष देऊन आवश्यक त्या ठिकाणी मुलांना सूचना दिल्यास अक्षर लेखनात नक्की सुधारणा होऊ शकते. मात्र नेमके याच ठिकाणी पालक आणि शिक्षकांच्या हातून चूका होतात. प्रत्येक मुलांचे अक्षर वेगवेगळे असते, पण थोडी मेहनत घेतली तर प्रत्येक मुलांचे अक्षर सुंदर आणि वळणदार होऊ शकते, हा विश्वास असले पाहिजे. अनुलेखनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर श्रुतलेखनाकडे वळावे लागते. ज्याची श्रवण प्रक्रिया अगदी पूर्ण झाली असेल तेच मूल श्रुतलेखन करू शकते. ऐकून लिहिणे ही प्रक्रिया वाटते तेवढी सोपे नाही. कारण कोणाला काय ऐकू येते आणि कोण काय समजून घेतो यावर ही लेखन प्रक्रिया अवलंबून आहे. वर्गात सर मुलांना ऐकून लिहिण्यास सांगतात दैवत आणि मुले लिहितात दईवत असे कश्यामुळे होते याचा शोध लावणे अत्यावश्यक आहे. मुलांचे या दोषाचे निदान झाले नाही तर पुढे त्याचा भाषा विकास होणे शक्य नाही. आपले विचार डोक्यात आल्यानंतर त्यास शब्दबध्द करून त्याची मांडणी

करणे सर्वांना जमेलच असे ही नाही. कित्येक मंडळी एका शब्दावरुन खुप काही लिहितात त्यास राईचा पर्वत करणे म्हणू शकतो. तर काही मंडळी आपले विचार लिहूच शकत नाहीत. त्यांची नेहमी तक्रार असते की मला साध्या दहा ओळी लिहिता येत नाही. आमच्या गुरुजींनी आम्हाला कधी शिकविले नाही. अन्यथा आम्ही सुध्दा आज शिक्षक म्हणून राहिलो असतो, असे ऐकायला मिळते. समाजात वेगवेगळया प्रकारची लोक राहतात परंतु सर्वच लोक लिहू शकतात अशी बाब नाही. ज्याला दृष्टी आहे आणि विचार करण्याची शक्ती आहे तोच आपल्या लेखणीद्वारे समाज प्रबोधनाचे कार्य करू शकतो. स्वातंत्र्यपूर्व काळात महात्मा फुले, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लेखणीच्या माध्यमातून जनजागृती केली आणि इंग्रजाना भारतातून हाकालुन दिले. एवढी प्रचंड ताकद या लिहिण्यात आहे. ही ताकद पूर्वी ही होती आणि आजही आहे, यात शंका नाही. आज संगणक च्या युगात डिजिटल शाळा आणि ई लर्निंग मुळे मुले हळूहळू कागदवार लिहिण्यापासून दूर होत आहेत. अक्षरांच्या बटन वर दाब देऊन लेखन करण्याच्या युगात लेखन  कला लोप पावते की काय अशी अनामिक भीती राहून राहून मनात येत राहते. समाजातील प्रत्येक लोकांचा मनामानात आणि घराघरात पोहोचलेला व्यक्ती म्हणणे शिक्षक. लोकांच्या मानसिक, आर्थिक, सामाजिक आणि कौटुंबिक प्रश्नापर्यंत शिक्षकांशिवाय कोणी पोहोचु शकत नाही. त्यामुळे शिक्षक मंडळीनी खास करून लिहिण्यावर भर द्यावा. समाजातील विविध समस्या, प्रश्न आणि शंकेचे निराकरण आपल्या लेखणीच्या मार्गदर्शनातून शिक्षकांने करणे आवश्यक आहे. परमपूज्य साने गुरुजी यांच्या जीवन चरित्राकडे बारकाईने लक्ष दिल्यास एक गोष्ट कळून चूकते की, शिक्षकांच्या लेखणीत समाज परिवर्तन करण्याची ताकद किती मोठ्या प्रमाणात आहे. लिहिणाऱ्या व्यक्तीला अनेक गोष्टीचा विचार करावा लागतो त्यामुळे तो प्रगल्भ व्यक्ती असतो. शिक्षणाची जागतिक प्रेरणा स्थान ठरलेली मलाला युसूफजाई म्हणते की, माझ्या हातात पुस्तक आणि

पेन द्या मी जगात क्रांती करून दाखवेन. ही प्रेरणा लक्षात घेऊन शिक्षकांमध्ये सुधारणा हवी असेल तर ते फक्त लेखनातून विकसित होऊ शकते. रोज एक तरी पान आपल्या मनातील विचार लिहिण्याची पध्दत एका वेगळयाच वळणावर नेऊन ठेवेल, यात शंका नाही. शिक्षकच मुलांना लिहिते करू शकतात. पण त्यासाठी शिक्षक साहित्याचा रसिक असणे आवश्यक आहे. त्याला स्वतःला लिहिण्याची आवड असेल तरच तो मुलांना याबाबतीत  काही सांगू शकतील. जो शिक्षक लेखक आहे त्यांच्या शाळेतील मुले काही ना काही नवसाहित्य निर्माण करू शकतात. म्हणून शिक्षकांनी कविता, गजल आणि लेख लिहित राहाणे आवश्यक आहे.त्यामुळे शिक्षक मित्रांनो चला उचला लेखणी आणि लागा लिहायला. पहिल्यांदा चुकाल तरच शिकाल ना. जो चुकत नाही सहसा तो शिकत नाही किंवा जो काही करतच नाही तोच चुकत नाही असे म्हणण्यास हरकत नाही. चूका आणि शिका या तत्वानुसार शिक्षकांस समाधानी जीवन जगण्यासाठी लिहिण्याशिवाय पर्याय नाही, असे वाटते.

# प्रत्येक शाळेला संरक्षणभिंत हवे

प्रत्येक गावात स्थानिक स्वराज्य संस्थेची जिल्हा परिषद प्राथमिक शाळा असते. पूर्वीच्या शाळा कोणाच्या घरात, ओसरीवर किंवा झाडाखाली भरविली जात असे आणि सर्वांना शिकवायला एकच शिक्षक असायचा. मात्र हळूहळू हे चित्र बदलत गेले. आज प्रत्येक गावात शाळेसाठी किमान दोन वर्गखोल्या आणि दोन शिक्षक आहेत. गावाला या शाळेचा खूप आधार असतो. अडी अडचणी ला गावातील लोक याच शाळेचा आधार घेतात. गावातील एखादे छोटे मोठे लग्न असो किंवा इतर काही कार्यक्रम प्रत्येकजण शाळेच्या मैदानाचा आणि वर्गखोलीचा हमखास वापर करतात. सरकारी शाळा ही सार्वजनिक मालमत्ता असते त्यामुळे शिक्षक मंडळी देखील कोणाला काही बोलू शकत नाहीत. मात्र ज्या शाळेला संरक्षण भिंत आहे त्या शाळेची सुरक्षितता जास्त प्रमाणात आहे. शाळेच्या मुख्याध्यापकांची परवानगी घेतल्याशिवाय येथे काही करता येत नाही. त्यामुळे शाळेत बाहेरच्या बाजूला असलेली रंगरंगोटी टिकून राहते. शाळेचे मैदान कोणी खराब करू शकत नाही. मैदानातील बाग विविध फुलझाडांनी बहरून आणता येते. मनात जे काही आणले ते सिद्धीस नेता येते. शाळेचे सौदर्य देखील।खुलून दिसते. याउलट संरक्षण भिंत नसेल तर मात्र अनेक संकटाला तोंड द्यावे लागते. शिक्षक आणि विद्यार्थी दिवसभर शाळेत स्वच्छता करून ठेवतात. शाळा सुटल्यानंतर काही क्षणात गावातील उनाड मुले शाळेत विविध खेळ खेळून शाळेचा परिसर अस्वच्छ करतात. काही तरुण मुले तंबाखू आणि गुटखा खाऊन शाळेच्या दारात थुंकतात. त्यामुळे सकाळी त्याचा उग्र वास दरवळत असतो. काही मद्यपी मंडळी शाळेच्या आवारात दारू पितात आणि दारूची बाटली मैदानात फोडून काचा पसरवितात. याहीपुढे जाऊन काही महाभाग वर्गात दारूची बाटली फोडतात आणि सकाळी गुरुजीला

काम लागावे असे करतात. शाळेतील शौचालय तर कधी ही पहा तेथे घाण केल्या जाते. शिक्षक मुलांच्या मदतीने स्वच्छ करून घेतात तर काही विघ्नसंतोषी लोक शौचालय विद्रुप करून ठेवतात. शाळेचा बाह्य भिंतीवरील अनेक चित्रे आणि नकाशे विद्रुप केली जातात. वृक्षारोपण किती ही वेळा करू द्या तेथे एक ही वृक्ष लागवड होऊ शकत नाही. गावातील लोकं जाण्याचा रस्ता शाळेतूनच, जनावरे जाण्याचा रस्ता शाळेतूनच, गाड्या आणि वाहने जाण्याचा रस्ता देखील शाळेतूनच त्यामुळे शाळेतील मुलांना शिक्षक कोणत्याही प्रकारचे संरक्षण देऊ शकत नाही. काही शाळेतील अत्यंत महत्त्वपूर्ण साहित्य चोरीला गेल्याची बातमी जेंव्हा वाचण्यात येते तेंव्हा खूप दुःख वाटते. आज गावोगावी च्या शाळा डिजिटल मध्ये रूपांतरित होत आहेत. त्यामुळे प्रत्येक शाळेत एक लाखांच्या आसपास डिजिटल साहित्य असते. मात्र त्याची सुरक्षितता रामभरोसे आहे. शाळेतील काही खेळ किंवा कृतीयुक्त बाबी घेण्यासाठी शाळेचे मैदान काहीच कामी येत नाही. ततेच जर संरक्षण भिंत असेल तर शिक्षक आणि विद्यार्थी सुरक्षितपणे ज्ञानार्जन करू शकतात. त्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधी, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सभापती, आमदार आणि खासदार यांनी शासनाला याबाबीकडे गांभीर्याने लक्ष देण्याविषयी निवेदने देऊन प्रत्येक शाळेला संरक्षण भिंत बांधून देण्यासाठी खास तरतूद करण्याची सूचना केल्यास शाळेची सुरक्षितता वाढेल असे वाटते.

## एकच ध्यास ; वाचन विकास

शिक्षण प्रक्रियेतील वाचन हे एक प्रमुख कौशल्य आहे. ज्यावर विद्यार्थ्यांची भविष्यातील प्रगती अवलंबून असते. भाषा विकासातील श्रवण व भाषण यानंतरचा टप्पा म्हणजे वाचनकौशल्याचा. प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ स्टुअर्ट रिची यांनी आपल्या संशोधनात असे म्हटले आहे की, मुलांची वाचन क्षमता आणि त्याला किती लहान वयात वाचन करता येते त्यावर त्याची पुढील प्रगती अवलंबून आहे. यासोबत ते पुढे असे म्हणतात की, आपल्या मुलांचा अभ्यास पक्का करायचा असेल तर तो शाळेतील पुस्तके वाचतो की नाही हे तर बघावेच, याशिवाय अन्य काही अवांतर पुस्तक वाचन करतो की नाही , याकडे सुद्धा लक्ष ठेवावे. कारण जी मुले अवांतर पुस्तकांचे वाचन करतात त्यांचाच अभ्यास पक्का असतो असा आजपर्यंतचा अनुभव सांगतो. परंतु आपण तसे न करता मुलांवर नेहमी अभ्यासाचे ओझे टाकीत असतो. फालतू वाचन करण्यात वेळ घालविण्यापेक्षा तेवढाच वेळ शाळेचा अभ्यास केलास तर चार-पाच मार्क जास्त पडतील ! असा उपदेश मुलांना प्रत्येक घरातून मिळत असतो. यातून आपण आपल्या मुलांना फक्त परीक्षार्थी बनवित नाही काय? याशिवाय मुले जास्तीत जास्त वेळ वाचनात कसा घालावतील या दृष्टिकोनातून आपण कधी विचार केलाय का? मुलांना अवांतर वाचन करता यावे यासाठी घरात वाचनासाठी उपयुक्त असा पुस्तकांचा साठा करावा. मुलांना पुस्तकालयाच्या ठिकाणी नेऊन त्यांच्या आवडीचे पुस्तक निवडण्यास मदत करावी. लहान मुलांसाठी प्रकाशित होणाऱ्या मासिक किंवा साप्ताहिक वृत्तपत्राचे वर्गणीदार व्हावे. यातून मुलांवर हळूहळू वाचन संस्कार होऊ शकतात. टी.व्ही. किंवा

मोबाईलवरील चित्रे पाहण्यापेक्षा पुस्तकातील रंगीत चित्रे पाहणे कधी ही चांगले. कारण टी.व्ही. किंवा मोबाईलवरील चित्रे मुलांना निर्बुद्ध, आळशी व अकार्यक्षम बनवू शकतात. तर पुस्तकातील चित्रे मुलांना नवप्रेरणा देतात, चेतना निर्माण करतात. त्यातून त्यांना काही तरी नवनिर्मिती करण्याची स्फूर्ती मिळते. वाचनातून मग मुलांच्या बुद्धीचा विकास होतो. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जर वाचनाचे वेड राहिले नसते तर ते महामानव बनूच शकले नसते आणि त्यांच्या हातून घटना निर्मितीचे एवढे महान कार्य घडले नसते. तासनतास ते ग्रंथालयात बसून वाचन करीत असत. त्यातूनच त्यांना नवीन ज्ञान मिळत होते. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम हे दिवसातून अठरा तास वाचन करीत असत. परंतु आज सर्वांना वाचन म्हटले की कंटाळा येतो. घरात मुलांना पुस्तकांचे वाचन करा असे म्हणण्यापूर्वी घरातील वडीलधारी मंडळींनी वाचन करणे आवश्यक आहे. रोज सकाळी आपल्या घरात येणाऱ्या वृत्तपत्राने मुले वाचनाकडे वळू शकतात. आपल्या घरी कमीतकमी दोन वृत्तपत्र नियमित यायला हवे. यामुळे नकळत मुले अवांतर वाचनाकडे जाऊ शकतात. अगदी सुरुवातीला तो चित्रेच पाहिल परंतु कालांतराने त्याला त्यातील मजकूर वाचण्याची आवड लागते. जो चांगल्या प्रकारे वाचन करतो त्याचीच प्रगती उत्तमप्रकारे होत असते. शाळेत आज अशी स्थिती बघायला मिळते की पाचव्या वर्गातील मुले दुसऱ्या वर्गातील पुस्तकांचे अस्खलित वाचन करू शकत नाहीत. याचे करणे अनेक असू शकतात. मात्र खरे कारण म्हणजे त्याच्या वाचनाकडे आजपर्यंत कोणी लक्षच दिले नाही. चांगल्या प्रकारे लिहू शकतो मात्र वाचताना अडखळतो, असे का? याचे उत्तर शोधण्याचा कधी प्रयत्न केलाय काय? अर्थात याचे उत्तर नाही असे येते. वाचन करता येत नसल्यामुळे मुलांच्या मनात एक वेगळीच भीती निर्माण होते आणि कालांतराने तो शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून दूर जातो. प्राथमिक शिक्षण चालू असतानाच त्या मुलांवर वेळीच उपचार झाल्यास मुलांची प्रगती शक्य आहे. प्रत्येक मूल शिकू

शकते, वाचू शकते असा विश्वास जोपर्यंत शिक्षकांमध्ये तयार होत नाही तोपर्यंत त्या मुलांची प्रगती होऊ शकत नाही. शिक्षकांचा मुलांविषयी असलेला सकारात्मक दृष्टिकोनच मुलांना पुढे नेऊ शकते आणि नकारात्मक दृष्टिकोन आपणास प्रयत्न करायला सुरुवात करू देत नाही. एखाद्या मुलांना काय येते आणि काय येत नाही हे आपण आत्ताच ठरविता येत नाही. पण त्या मुलांना तो भाग समजला नसेल तर वेगळया पद्धतीने सांगावे लागते. आजपर्यंत आपण प्राथमिक वर्गात महाविद्यालयाच्या व्याख्यान पद्धतीने सांगत आलो. गरज असणाऱ्या मुलांना आणि गरज नसणाऱ्या मुलांना सुद्धा तेच शिकवीत आलोत म्हणजे समानतेने शिकविलो. पण ज्याला अजून शिकविण्याची गरज आहे, ती त्याची गरज पूर्ण न करता पुढे जात राहिलो त्यामुळे तो मागे पडला, त्याला कधी तरी समतेने शिकविलो काय? प्रत्येक शिक्षकांनी याचे स्वतः शी आत्मपरीक्षण करणे आज गरजेचे आहे. म्हणूनच शासनाने यावर्षी इयत्ता पहिली ते पाचवी वर्गातील सर्व मुलांना अस्खलित वाचन करता यावे म्हणून साठ दिवसाचा मूलभूत वाचन विकास कार्यक्रम आणित आहे. ज्यात प्रत्येक मुलांची वाचन विकासाच्या आठ टप्प्यात विचार केला जाणार आहे. विद्यार्थी ज्या टप्प्यावर आहे तेथून त्या विद्यार्थ्यांचा वाचन कौशल्य विकसित करता येणार आहे. डॉक्टर ज्या प्रकारे एखाद्या रुग्णाची केस स्टडी करतो त्याचा धर्तीवर शिक्षक आत्ता मुलांची केस स्टडी करणार आहेत. सर्व शिक्षकांचा आत्ता एकच ध्यास लागलेला आहे ते म्हणजे वाचन विकास. ज्ञान प्राप्त करण्यासाठी वाचन आवश्यक आहे. म्हणूनच म्हटले आहे " वाचाल तर वाचाल "

# मुलांच्या प्रगतीसाठी .........!

शाळेची गुणवत्ता खराब आहे किंवा शाळेतील मुलांना काही न येणे ह्यासाठी फक्त शिक्षक जबाबदार नाहीत असे यूनेस्कोने नुकतेच आपल्या न्यू ग्लोबल एजुकेशन मॉनिटेरिंग रिपोर्टमध्ये म्हटले आहे. शिक्षक हा एक दिशादर्शक आहे. मात्र त्या दिशेचे पालन योग्य प्रकारे होत नसेल तर शिक्षक त्यात दोषी कसा असू शकतो असा ही प्रश्न निर्माण होतो. विद्यार्थ्याची प्रगती ही तीन बाबीवर अवलंबून असते. एक म्हणजे तो स्वतः असतो, दुसरा त्यांचा पालक आणि त्यानंतर शेवटी येतो शिक्षक. विद्यार्थ्याच्या मनात शिक्षणाविषयी गोडी, अभिरूची किंवा आवड जोपर्यंत निर्माण होत नाही तोपर्यंत कोणत्याही शिक्षकाला काहीच करता येत नाही. बहुतांश वेळा पालक शिक्षकांकडे तक्रार करतात की, हा शाळेलाच जात नाही. शाळेला जा म्हटले की, रडत बसतो. काय करावे कळत नाही. अशी समस्या जेंव्हा पालक व्यक्त करतात तेंव्हा शिक्षक काय करू शकतो? एखादा उपक्रमशील शिक्षक काही तरी आयडिया वापरून त्याला शाळेत आणण्याचे काम करेल. पण हे सर्व शिक्षकांना जमेल असे खात्रीपूर्वक सांगता येत नाही. आज देशात किती तरी मुले शिक्षणाच्या प्रवाहाच्या बाहेर आहेत. त्याची संख्या लाखाच्या घरात आहे. न्यायालयाने देखील सरकारला याविषयी मार्चअखेर सर्वेक्षण करण्याचे सूचविले आहे. ही मुले विविध कारणामुळे शाळाबाह्य राहतात. महिन्यातून अर्धे दिवस शाळेतून गायब राहणाऱ्या मुलांच्या गुणवत्तेसाठी शिक्षकांना जबाबदार धरणे संयुक्तिक वाटत नाही. घरात नवरा-बायकोचे भांडण किंवा वाद झाले की बायको माहेरी निघुन जाते आणि सोबत शाळेतील मुलांना घेऊन जाते. काही महिन्यानंतर त्यांचा वाद मिटतो. तोपर्यंत त्या मुलांची शाळा वाऱ्यावर असते. असे उदाहरण ग्रामीण भागातील अनेक शाळेत अनुभवास येतो. काही पालक घरातील आणि

शेतातील कामासाठी अधुनमधून शाळेत शिकणारी मुले गुरुजींना सांगून घेऊन जातात. असे एक दोन वेळा झाले तर ठीक आहे. मात्र सुगी आली की, त्यांचे हे रोजचे असते. उडीद-मुग सोयाबीन तोडणीच्या वेळी आणि त्यानंतर कापूस वेचणी अश्या काळात मुलांची उपस्थिती कमी आढळून येते. तिथे पालकाना देखील काही म्हणता येत नाही कारण ती त्यांची गरज असते. उद्याच्या काळजी पेक्षा त्यांना आजची चिंता जास्त खाते. यामुळे नाइलाजास्तव काही पालकाना असे पाऊल उचलावे लागतात. अश्या वेळी ही मुले अभ्यासात मागे राहतात. मग दोष कुणाला द्यावा. अश्या वेळी परिस्थिती ही फार मोठी दोषी आहे, बाकी काही नाही, असे वाटते. पालक शिक्षणाच्या बाबतीत जागरूक असेल तर त्यांची मुले नक्कीच हुशार असतात. असा आपल्या सर्वांचा अंदाज आहे आणि तो खरा आहे. मग जागरूक नसलेल्या पालकांची मुले गुणवंत नसतात काय? तर ते देखील असतात कारण त्यांना गरीबीचे चटके लागलेले असतात. त्यांना शिक्षणात एक ज्योत दिसते म्हणून ते चिकाटीने आणि जिद्दीने अभ्यास करतात. दिवसरात्र मेहनत करून यश मिळवितात. त्यांच्या यशाचे श्रेय शिक्षकांना आहे काय? शिक्षकांना श्रेय मिळतेच पण खरी मेहनत त्या मुलांची आहे. मला असे मुळीच म्हणायचे नाही की, चांगले झाले की ते श्रेय शिक्षकांनी घ्यावे आणि काही वाईट झाले की पालकावर सोडावे. मुलांच्या प्रगतीत जेवढा पालकांचा वाटा असतो तेवढाच वाटा शिक्षकांचा देखील असतो. शाळेत शिकविणारा शिक्षक घरात पालक होऊन मुलांना शिकवू शकत नाही. म्हणून पालक किती ही ज्ञानी असला तरी त्याला त्याच्या मुलांना यशस्वीपणे शिकविता येत नाही. आमचे गुरुजी जे म्हणाले तेच खरे असे बरीच मुले घरी बोलतात. म्हणून शिक्षकांनी देखील मुलांच्या प्रगती आणि गुणवत्ता याबाबतीत पालकासोबत हातात हात घालून चालल्यास मुलांची प्रगती नक्कीच दिसून येईल, असे वाटते.

## राष्ट्रगीत आणि राष्ट्रभक्ती

शाळेत शिकत असताना गुरुजी मुलांना संगत की, राष्ट्रगीत चालू असताना सावधान स्थितीमध्ये स्तब्ध उभे रहावे, कसल्याही प्रकारचे हालचाल करू नये. तसे केल्यास राष्ट्रगीताचा अपमान समाजल्या जातो. या सूचनेचे पालन करीत मुले रांगेत उभे राहून सरळ समोर पाहत ताठ मानेने राष्ट्रगीत एका सुरात आणि तालबध्द पद्धतीने म्हणतात. अश्या या रोजच्या कृतीमुळे मुलांमध्ये राष्ट्राभिमान जागृती करता येते. देशातील प्रत्येक शाळेची सुरुवात ही राष्ट्रगीताने होते. कधी कधी पावसाळ्याच्या दिवसांत बाहेर भरपूर पाऊस चालू असतो अश्या वेळी राष्ट्रगीत म्हणण्यासाठी मैदानात जाता येत नाही त्यावेळी वर्गावर्गात राष्ट्रगीत म्हटले जाते. त्याशिवाय शाळेची सुरुवात केल्यास दिवसभर काही तरी हरवल्यासारखे अस्वस्थ वाटते. अगदी लहानपणापासून आपल्या मनात राष्ट्राविषयी स्वाभिमान जागे करण्याचे काम या राष्ट्रगीतामार्फत केल्या जाते. नोबेल पारितोषिक विजेते गुरुदेव रविंद्रनाथ टागोर यांच्या गीतांजली या जगप्रसिध्द पुस्तकातील जन गण मन हे काव्य भारताचे राष्ट्रगीत म्हणून सन 1950 मध्ये स्विकार करण्यात आले. त्यपूर्वी 27 डिसेंबर 1911 मध्ये कोलकताच्या राष्ट्रीय अधिवेशनात हे गीत सर्वात पहिल्यांदा गायिले गेले. प्रत्येक देशाला एक राष्ट्रगीत असतेच ज्यातून त्या देशाची इत्यंभूत माहिती दिली जाते. त्या देशाचा इतिहास आणि परंपरेची माहिती देखील यातून मिळते म्हणूनच राष्ट्रगीताला अनन्यसाधारण महत्त्व आहे. अश्या या देशाभिमान जागृत करणाऱ्या राष्ट्रगीताविषयी काही बोलले जाते तेच मुळात चुकीचे आहे. एकीकडे राजस्थानच्या जयपूरचे महापौर अशोक काटोल यांनी दोन वेळा राष्ट्रगीत सक्तीचे केले आहे म्हणून चर्चेचा विषय ठरतो तर दुसरीकडे सर्वोच्च न्यायलयातील एका सेवानिवृत्त न्यायाधीशाने राष्ट्रगीत चालू

असताना उभे रहाणे बंधनकारक नसावे असे म्हटले आहे. यावरून मग देशात चर्चेला सुरुवात होते. अन्य कुणी तरी हा विषय न्यायालयात दाखल करतात. म्हणजे हे सर्व असहिष्णुतेचे लक्षण आहेत. दिवसेंदिवस लोकांमधील देशाभिमान आणि देशभक्ती कमी कमी होताना दिसून येत आहे. याला कारण देखील भरपूर असतील. मात्र आज भारतात जे काही चित्र पाहायला मिळत आहे त्यास अनेक बाबी कारणीभूत आहेत. सर्वात पहिल्यांदा म्हणजे शालेय स्तरावर जे राष्ट्रगीत चालते ते फक्त दहाव्या वर्गापर्यंतच्या शाळेतच चालते. मुले कॉलेजमध्ये गेले की, त्यांना राष्ट्रगीताचा विसर पडतो. कारण इयत्ता अकरावी वर्गापासून मुलांना राष्ट्रगीत सक्तीचे नसते. कॉलेजमध्ये फक्त राष्ट्रीय सणाच्या म्हणजे स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन या दिवशीच राष्ट्रगीताची धुन ऐकण्यास मिळते. त्यामुळे येथील शिक्षक आणि विद्यार्थी यांचे राष्ट्रगीताविषयीचे प्रेम हळूहळू संपुष्टात येते. म्हणून कॉलेजमध्ये देखील राष्ट्रगीत म्हणायलाच आहे. विद्यापीठमधून देखील राष्ट्रगीत म्हटले तर देशभक्ती जागृत राहु शकेल. एक ठराविक वेळ ठरवून कॉलेज आणि विद्यापीठामधून राष्ट्रगीत चालू करणे आवश्यक आहे. तरच लोकांमध्ये देशभक्ती जागृत राहील. कळत्या आणि समजदार वयात हे राष्ट्रगीत त्यांच्या कानावर जात नाही त्यामुळे ते सदरील विषय गंभीरपणे घेत नाही. सर्व सरकारी कार्यालयाची सुरुवात सामूहिक राष्ट्रगीताने होणे आवश्यक आहे. त्यामुळे कोण वेळेवर उपस्थित राहतात याची ही माहिती होईल. सध्या ऑफिसमधले कर्मचारी आणि अधिकारी केंव्हाही येतात आणि केव्हाही जातात. अश्या वागणुकीवर नक्की बंधने येतील. कोणत्याही सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात ही राष्ट्रगीताने झाली तर कार्यक्रमात खुप उत्साह आणि चैतन्य दिसून येते. चित्रपट सुरु होण्यापूर्वी सिनेमागृहात राष्ट्रगीतची धुन वाजविण्याची सक्ती योग्य वाटते. कभी ख़ुशी कभी गम या चित्रपटात सर्वप्रथम राष्ट्रगीताचा वापर झाला. त्यावेळी चित्रपट चालू असताना तो राष्ट्रगीताचा प्रसंग आल्यावर अनेक मंडळी सिनेमागृहात उभे राहिले होते. राष्ट्रगीताचा सिनेमात शक्यतो वापर करू नये. जागतिक पातळीवर एखादा सामना सुरु होण्यापूर्वी त्या त्या देशाचे राष्ट्रगीता ची धुन वाजविली जाते. त्यातून

एक प्रकारे राष्ट्रभक्ती प्रकट होते. म्हणून राष्ट्रगीताविषयी आपल्या मनात किंतु, परंतु अशी शंका मनात न आणता राष्ट्रगीत आपल्या कानावर पडले की ज्यांचे पाय आपोआप उभे होण्यासाठी उठतात, त्यांच्या मनातच खरी राष्ट्रभक्ती असते, असे वाटते. राष्ट्रभक्ती दाखविण्यासाठी कुण्या कायद्याची निश्चित अशी गरज नाही.

# शिक्षक आनंदी तर मुले आनंदी*

वयाची सहा वर्षे पूर्ण होईपर्यंत घरातल्या वातावरणात खेळणाऱ्या मुलांची पहिली गुरु ही त्यांची आई असते. ती त्यांना बोलायला, चालायला आणि वागायला शिकविते. त्यानंतर ते मूल शाळेत शिकण्यासाठी प्रविष्ठ होते. शाळेत शिकणारी चिमुकली मुले हेच देशाचे खरे आधारस्तंभ आहेत. त्यांच्यावर चांगले संस्कार करण्याची जबाबदारी शिक्षकांवर असते. म्हणून म्हटले जाते की, देशाला घडविण्याचे सर्वात मोठे कार्य शिक्षकांच्या हातून होत असते. ज्ञान देणारे शिक्षक सर्वगुणसंपन्न असावे म्हणजे त्यांचे विद्यार्थी देखील तसेच सर्वगुणसंपन्न तयार होतील. चिमुकल्यांचं भविष्य उज्ज्वल करण्याचं काम करणाऱ्या शिक्षकांनी आनंदात राहून ज्ञानदानाचे काम करणे आवश्यक आहे, कारण शिक्षक आनंदी असेल तरच त्यांच्या समोरचे पाच-पन्नास चिमुकले आनंदी होतील. शिक्षकांनी दुःखी होऊन किंवा शिक्षकांची मानसिक स्थिती चांगली नसेल तर ते चांगले अध्यापन करू शकतात काय ? नाही. त्यामुळे शिक्षकांनी आपला मानसिक, शारीरिक, कौटुंबिक आणि आर्थिक त्रास विसरून अध्यापनाचे कार्य करणे अत्यावश्यक आहे. ही जबाबदारी लक्षात घेऊन शिक्षकांनी कार्य केले पाहिजे. हसमुख चेहऱ्याचे शिक्षक सर्वांना हवेहवेसे वाटतात तर रागीट किंवा नेहमी काळजीत असलेल्यां शिक्षकांजवळ जाण्यास विद्यार्थी घाबरतो. शिक्षक आनंदी राहतील यासाठी शासन स्तरावरुन देखील तसे प्रयत्न व्हायला पाहिजे. पण वास्तविक तसे दिसत नाही. राज्यातील कित्येक शिक्षक आज विविध प्रकारच्या तणावाखाली आपले

अध्यापनाचे कार्य करीत आहेत. नुकतेच एक बातमी वाचण्यात आली होती की, शालेय बांधकाम असह्य झाल्यामुळे एका मुख्याध्यापकाने आत्महत्या केली. असे अनेक मुख्याध्यापक शालेय बांधकामाच्या तणावात काम करीत आहेत. मुख्याध्यापकाना आज विविध प्रकारची ऑनलाइन कामे करावी लागत आहे. त्याचा त्यांना खुप त्रास सहन करावा लागत आहे. काही शिक्षकांना यामुळे बीपी किंवा शुगर सारखे आजार जडली आहेत. पूर्वीच्या शिक्षण पध्दतीमध्ये आणि आत्ताच्या शिक्षण पध्दतीमध्ये आमुलाग्र बदल झालेला आहे. मात्र पूर्वीपेक्षा आत्ताच्या शिक्षकांना अध्यापनाच्या व्यतिरिक्त अन्य कामे जास्त करावी लागत आहेत. त्यामुळे शाळेतील शिक्षक सदा आनंदी कसा राहू शकेल हा एक प्रश्नच आहे.

यावर्षी शिक्षकांच्या ऑनलाइन बदली प्रक्रियेमुळे सर्व शिक्षक बदली होते की नाही किंवा बदली सोप्या क्षेत्रात होते की अवघड क्षेत्रात यांची काळजी प्रत्येक शिक्षकांना लागली आहे. त्यामुळे ज्यांची सेवा जास्त झाली आहे ते सर्वजण चिंताग्रस्त आहेत. शिक्षकांची सर्व माहिती ऑनलाइन करणे बंधनकारक करण्यात आले. पण सर्वच्या सर्व शिक्षकांची माहिती भरणे आणि ऑनलाइन पध्दतीने बदल्या करण्याचा शासनाचा हा पहिला प्रयत्न कसा असेल ? हे बदली झाल्याशिवाय कळणार नाही. पण एक सत्य आहे की, शिक्षकांना त्यांच्या सोईनुसार शाळा मिळाली तर त्यांचे अध्यापन देखील चांगले होऊ शकते. गेल्या वर्षी संपन्न झालेल्या सार्वत्रिक बदल्यामध्ये एका उपक्रमशील शिक्षकांची प्रशासकिय कारणावरुन घरापासून दीडशे किमी दूरच्या शाळेवर बदली झाली. या बदलीमुळे तो आर्थिक, शारीरिक, कौटुंबिक आणि मानसिक अश्या सर्व बाजूनी त्रस्त झाला. तेंव्हा शाळेवर खरोखर त्यांचे लक्ष किती असेल ? तो मन लावून अध्यापन करेल काय ? असाच एक दूसरा अनुभव म्हणजे दीडशे किमी दूर असलेला आमच्या एका शिक्षक मित्राची घराजवळच्या शाळेत बदली झाली. आज तो आनंदात अध्यापन करीत आहे. यावरून काय बोध घेता येईल. बदली प्रक्रियेतून शैक्षणिक गुणवत्ता कमी होत असेल

तर या बदलीबाबत कुठे तरी विचार व्ह्ययलाच हवे. मुलांना ज्याप्रकारे घराजवळील शाळा आकर्षित करते तसे शिक्षक मंडळींना देखील नक्कीच करत नसेल काय ? जर शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता वाढवायचे असेल तर शिक्षक मंडळी आनंदी कसे राहतील हे पाहणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी शासन स्तरावरुन शिक्षकांसाठी दोन तीन महिन्यातून एकदा निदान संकुलातील शिक्षक एकत्र येतील अश्या कार्यक्रमाची आखणी करावी. शिक्षकांना प्रेरीत करतील अश्या व्याख्यानाच्या किंवा समुपदेशनाच्या कार्यक्रमाचे नियोजन सहा महिन्यातून एकदा करण्यात यावे. निदान वर्षातून एकदा तालुका स्तरावर अगदी छोटेसे का होईना कवीसंमेलन किंवा शिक्षक साहित्यसंमेलन भरवून शिक्षकांच्या आत्मविष्काराला वाव मिळते का याचे निरिक्षण करण्यात यावे. आज साहित्य निर्माण करणाऱ्या शिक्षकांची संख्या भरमसाठ वाढली आहे. त्यामुळे शिक्षक अश्या संमेलानास उपस्थित राहणार नाहीत ही विचारधारा चूक ठरत आहे. प्रशासनात काम करणारे काही साहित्यप्रेमी अधिकाऱ्यांनी या गोष्टीचा अभ्यास करून नियोजन केल्यास शिक्षक खरेच आनंदी राहू शकतील आणि आपल्या विद्यार्थ्यामध्ये सुध्दा तसेच स्वप्न पाहतील असे वाटते.

## वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने.......!*

ज्ञान हा माणसाचा तिसरा डोळा आहे आणि ज्ञान हे वाचनातून मिळते. ज्याचे वाचन अधिक त्याचे ज्ञान सुध्दा अधिक. आपणाला ज्ञान हे वेगवेगळया माध्यमातून आणि वेगवेगळया मार्गाने मिळविता येतो. मात्र वाचनातून जे ज्ञान मिळते ते चिरकाल टिकणारे असते. प्रसिध्द विचारवंत ऑझक टेलर म्हणतात की, मनुष्याची वाढ ही अवयवानी होत नाही, तर विचारांनीच होते आणि विचारांना वाचनांनी सहज सहकार्य मिळते. जीवनातील अंधकार नाहीसे करण्यासाठी प्रत्येकाना वाचन करता आलेच पाहिजे. याचमुळे तर आपण आपल्या मुलांना वयाच्या सहाव्या वर्षी वाचन-लेखन शिकण्यासाठी शाळेत प्रवेश देतो. त्या ठिकाणी मुलांवर वाचनाचे संस्कार केले जातात. वाचन काय करावे आणि कसे करावे याची प्राथमिक माहिती ज्याला असते तोच उत्तम प्रकारे वाचन करू शकतो. आपल्या मनात चांगले विचार यावेत असे जर आपणास वाटत असेल तर त्यासाठी प्रथम चांगले वाचन करणे आवश्यक आहे. प्रसिध्द विचारवंत टॉलस्टॉय यांनी म्हटल्याप्रमाणे अश्लील पुस्तके वाचणे म्हणजे विष प्यायल्याप्रमाणे असते. यामुळे स्वतःचे नुकसान तर होतेच शिवाय समाजाचे आणि देशाचे सुद्धा फार मोठ्या प्रमाणात नुकसान होते. भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधी म्हणतात की, पुस्तके वाचन करणे म्हणजे आपले मन निर्मळ करणे होय. पुस्तकातल्या विविध बाबीचा थेट परिणाम वाचकांच्या मेंदूत जाऊन भिडतो. जी व्यक्ती वाचन करते तीच व्यक्ती विचार करू शकते. आजच्या संगणक आणि सोशल मीडियाच्या जगात वाचन संस्कृती कमी व्ह्ययला लागली त्यामुळे नैतिकता सुध्दा लयाला जात आहे. सर्व काही वाईट बाबी त्यांच्या डोळयासमोर येत असल्यामुळे त्याला चांगले काही सुचत नाही. जीवनात वाचनाचे अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. वाचनाने माणूस समृद्ध होतो. त्यातल्या त्यात नियमित वाचन केल्यामुळे ज्ञानात देखील वाढ होते. पण ही

वाचन करण्याची आवड कशी निर्माण करावी आणि वाचन कौशल्य कसे विकसित करावे याबाबत कोणी बोलताना दिसत नाहीत किंवा मार्गदर्शन देखील करताना आढळून येत नाहीत. शिक्षणतज्ञ आणि लेखक हेरंब कुलकर्णी यांचे 'बखर शिक्षणाची ' हे पुस्तक पुण्यातील राजहंस प्रकाशनाने काढलेले आहे, यात लेखकाने शिक्षक व पालकांनी जी पुस्तके वाचलीच पाहिजेत अशा ५४ पुस्तकांचा परिचय करून दिला आहे. ती मूळ पुस्तके मिळवून शिक्षक आणि पालकांनी वाचली तर खरे शिक्षण म्हणजे काय हे कळते. शिक्षकांना ही पुस्तकं स्वतःमध्ये बदलण्याची प्रेरणा  देतात. पुस्तकाविषयी लेखकांचे मनोगत youtube वर देखील पाहायला मिळेल. खरे पाहिले तर वाचनाविषयी असे चर्चासत्र किंवा मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. प्राथमिक वर्गातील मुलांची वाचन क्षमता वाढली तर त्यांची प्रगती निश्चितपणे होऊ शकते त्यामुळे मुलांची वाचन गती कशी वाढविता येईल यावर थोडा विचार होणे आवश्यक आहे. मुलांमध्ये वाचनाची आवड आणि योग्य गती मिळविण्यासाठी खालील प्रकारच्या उपाय योजना करण्यात आले तर त्याचे निश्चित असे परिणाम पाहायला मिळतात. मुलांना रोज पाच वाक्ये वाचन करण्यासाठी प्रोत्साहित करण्यापासून सुरुवात करावी. वाचनासाठी तसे वातावरण तयार करणे आवश्यक आहे. अगदी सुरुवातीला लहान लहान गोष्टीची पुस्तके त्यांना वाचण्यास द्यावी. सुरुवात सोप्या वाक्याने केली तर मुलांमध्ये वाचनाची गोडी लागते. त्यानंतर हळूहळू जोडाक्षर किंवा मोठे शब्द असलेले वाक्य वाचण्याचा सराव करून घ्यावे. सध्याच्या काळात मुलांचे वाचनाकडील लक्ष फार कमी झाले आहे. ही वाचन संस्कृती वाढविण्यासाठी शाळेतून विशेष प्रयत्न व्हायला पाहिजे. आज मुले भरपूर लिहितात मात्र वाचन करा असे म्हटले की कंटाळा करतात. लहानपणी वाचनाची सवय लागली तर मोठेपणी ही सवय त्यांच्या कामी येऊ शकते. म्हणून शाळाशाळामधून रोज एक तास वाचनासाठी राखीव ठेवून मुलांना त्यांच्या आवडीचे पुस्तक वाचण्याची संधी दिली जावी. जेथे लहान वर्ग आहेत तेथे

वाचलेल्या पुस्तकांची नोंद शाळानी ठेवायची आणि उच्च प्राथमिक वर्गात मात्र मुले वाचलेल्या पुस्तकांची नोंद ठेवल्यास योग्य परिणाम भविष्यात पाहायला मिळतो.

मुलांचे वाचन करून घेताना काही गोष्टी आवर्जून लक्षात घ्यावे म्हणजे वाचन योग्य दिशेने होईल. अगदी सुरुवातीला वाचन करताना प्रत्येक शब्दावरुन पहिले बोट फिरवावे त्यामुळे आपले लक्ष त्या शब्दावर राहते आणि मन एकाग्र राहण्यास मदत मिळते. सुरुवातीला मोठ्याने प्रकट वाचन करावे त्यामुळे त्या शब्दाचे ध्वनी मुलांच्या लक्षात राहील. त्यानंतर मूक वाचनाचा सराव केल्यास वाचन चांगल्या पध्दतीने करता येते. असे वाचन करण्याचा भरपूर सराव झाल्यावर पुढे चालून मौन वाचन करताना जसे शब्दावरुन बोट फिरवत होतो तसे बोट न फिरवता फक्त डोळे फिरवावे. त्यामुळे आपली वाचनाची गती वाढत राहते. एका मिनीटात आपण किती शब्द वाचतो यावर आपली वाचनाची गती ठरविली जाते. अशा क्रियेचा सर्वात जास्त फायदा म्हणजे आजुबाजुला किती ही गोंधळ असला तरी आपले लक्ष विचलित होत नाही, मन एकाग्र राहते. प्राथमिक वर्गात मुलांचे वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी समान आवाज असलेले शब्द, शेवटचे अक्षर समान असलेले शब्द, जोडशब्द, गमतीदार शब्द अशा शब्दांचे वाचन केल्यास त्याचा नियमित वाचन करताना फायदा होतो जसे की, अक्कल शब्दाचे वाचन झाल्यावर त्याच्या सारखेच आवाज असलेले नक्कल, शक्कल, टक्कल अश्या शब्दाचे वाचन केल्यास मुलांची वाचनाची गती नक्की वाढेल. तसेच त्यांची शब्दसंपत्ती देखील वाढ होईल. जेवढे जास्त शब्द मुलांना ओळखीचे होतील तेवढे त्याची वाचनाची गती चांगली होते. त्याचसोबत वाचनात नियमितपणा असणे आवश्यक आहे. डॉ. अब्दुल कलाम यांच्या जयंतीच्या निमित्त वाचन प्रेरणा दिवस सर्वत्र साजरा केला जातो. त्यानिमित्ताने एक-दोन दिवस वाचायचे आणि बाकी इतर दिवशी विसरून जायचे असे झाले तर वाचनात योग्य गती मिळत नाही. खरी वाचन प्रेरणा घ्यायची असेल तर महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि

डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांच्यासारखे नियमित वाचन करीत रहावे लागते. तीच खरी त्यांना आदरांजली ठरेल. म्हणून रोज किमान एक तास वाचन करण्याची दिवसातील एक वेळ ठरवावी आणि त्याच वेळी वाचन करीत रहावे.

# ऑनलाइन कामात गुरफटलेला शिक्षक

प्रत्येक बाबतीत समाजात आज प्रगती दिसून येत आहे. डिजिटलच्या तंत्रज्ञान युगात सर्व काही ऑनलाइन चालू आहे. प्रत्येक जण जे काही बोलत आहे ते सर्व ऑनलाइनच्याच भाषेत बोलत आहे. बाजारात एखादी चक्कर मारली तर लक्षात येते की येथे सुध्दा सारेच जण ऑनलाइन वरच काम करीत आहेत कोणी फेसबुक बघण्यात गुंग आहे तर कोणी व्हाट्सएप्प बघण्यात. प्रत्येक ठिकाणी आत्ता संगणकावर कामे केल्या जात आहेत असे एक ही कार्यालय नाही ज्याठिकाणी ऑनलाइन काम चालू नाही ? प्रत्येक ठिकाणी आज या संगणक आणि ऑनलाइन प्रक्रियेने आपले हातपाय पसरले आहेत असे दिसून येते. त्यात जर संगणक बिघडले किंवा विद्युत पुरवठा खंडित झाला किंवा इंटरनेट मध्ये काही समस्या निर्माण झाली की सर्व कामे मग ठप्प. काहीच काम करता येत नाही अर्थातच ऑनलाइनमुळे कामे वेगात होत आहेत मात्र यामुळे मनुष्य आळ शी बनून परावलंबी जीवन जगत आहे. कम्प्यूटर चालले तर ऑफिस चालणार, लाइट आणि नेट असेल तरच कार्यालयतील कामे होणार, अन्यथा नाही अशी स्थिती आज निर्माण झाली आहे. त्याचा जसा फायदा दिसतो तसा नुकसान ही आहे हेच तंत्रज्ञान शाळाशाळातुन वापर झाल्यास शाळाची संपूर्ण माहिती क्षणात मिळावी यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे त्याबद्दल शासनाचे अभिनंदन करावेसे वाटते मात्र अभिनंदन करताना इकडे शाळेत काय त्रास होत आहे याची जाणीव कदाचित शासकीय वरच्या स्तरातील अधिकारी - पदाधिकारी यांना नाही असे वाटते. कारण रोज काही तरी नविन बाब ऑनलाइन करण्याच्या सूचना शाळाना दिली जाते आणि शाळेतील शिक्षक व् मुख्याध्यापकाची त्रेधातिरपिट होते. वास्तविक पाहता सर्व शाळा ऑफलाइन असताना ऑनलाइनची कामे करावी कशी हे एक न सुटणारे कोडे आहे ज्याची

सोडवणूक करताना शाळेच्या प्रमुखाची हवा निघून जात आहे आज शाळेत कोणकोणती कामे ऑनलाइन करावी लागत आहे, याकडे थोडे कटाक्ष टाकू या.

* सरल प्रणाली अपडेट करणे - पटपडताळणी झाल्यानंतर बरीच बोगस पटसंख्या उघडकीस आली म्हणून राज्यातील सर्व शाळा आणि तेथील सर्व माहिती एका क्लिक वर मिळावे यासाठी शासनाने दोन वर्षीपूर्वी सरल प्रणाली विकसित केली. जेथुन शाळेतील ऑनलाइन प्रक्रियेला शुभारंभ करण्यात आला असे म्हणण्यास हरकत नाही. या प्रणालीत शाळेची इत्यंभूत माहिती भरण्यात आली. त्यात शाळा विद्यार्थी आणि शिक्षक हे तीन घटक परिपूर्णरित्या भरण्यात आले. पण ही माहिती भरताना काय त्रास झाला हे शाळाप्रमुख या नात्याने मुख्याध्यापक आणि माहिती भरणाऱ्या व्यक्तीलाच माहित आहे. सरल प्रणाली यावरच थांबली नाही तर प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम अंतर्गत घेण्यात आलेल्या परिक्षाचे गुण त्या विद्यार्थयाच्या नावसमोर ऑनलाइन भरणे हे ही काम करावे लागले. यापुढे खरा त्रास जाणवले ते म्हणजे विद्यार्थी शाळा सोडून जाताना. विद्यार्थ्याची प्रवेश प्रक्रिया ही पूर्णपणे याच प्रणालीवर अवलबुंन असल्यामुळे पुढील शाळा विद्यार्थी प्रवेश देण्यसाठी संबधित शाळेला विनंती करणे आणि ती विनंती शाळेने मान्य करणे ते ही ऑनलाइन त्यामुळे पुन्हा पुन्हा त्रास होत आहे. दरवर्षी ही माहिती अद्ययावत करणे आवश्यक असल्या मुळे एकदा भरले की संपले असे नाही. त्याचा खरोखर त्रास शाळेच्या प्रमुखाला होत आहे. एवढा सारा खटाटोप करून काय मिळविता आले ? हा एक संशोधनाच विषय आहे. शिक्षण अधिकार कायदा सर्व बाबतीत राबविला जातो तर विद्यार्थी प्रमाणात शिक्षकाची नेमणूक करण्यासाठी हे अधिनियम का बाजूला ठेवण्यात येते ? आज राज्यात कित्येक शाळेत मुलांना शिकविण्यासाठी पुरेश्या प्रमाणात शिक्षक नाहीत. शासन प्राथमिक शिक्षकांची भरती करण्याबाबत उदासीन आहे. गेल्या पाच सहा वर्षापासुन एकाही शिक्षकांची भरती करण्यात आली नाही.आहे त्या संख्येवर आज मुलांना शिकविण्याचे नाही तर

फक्त सांभाळण्याचे काम चालू आहे. शिक्षक भरती बाबत कुठे तरी सकारात्मक विचार केल्यास राज्यातील बेरोजगार युवकांच्या हाताला काही तरी काम मिळेल.

* अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती अर्ज करणे - इयत्ता पहिली ते दहाव्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्यांक समाजातील मुलांना सरकारने शिष्यवृत्ती देते त्यासाठी मात्र त्याचे विहित नमुन्यातील अर्ज ऑनलाइन भरणे गरजेचे आहे आणि ते पूर्णपणे मुख्यध्यापकाची जबाबदारी आहे असे आदेश देण्यात येतात. अल्पसंख्यांक मुलाचे आधार कार्ड आणि बँकेतील खाते हे दोन बाबी पूर्ण नसल्यास अर्ज भरणे अशक्य आहे आणि यावेळी तर पालकांच्या मोबाईल क्रमांकावर ओटीपी जात आहे. त्यामुळे मुख्याध्यापकासह पालक वर्ग देखील हैराण होत आहे. मग मुख्याध्यापक या बाबीसाठी त्यांच्या मागे फिरत राहील की शाळा करेल त्याच सोबत त्यांचे अर्ज ऑनलाइन भरण्यासाठी वेळेची मर्यादा ? अश्या वेळी मुख्याध्यापक मंडळीनी काय करावे ? या प्रश्नांची सोडवणूक कोणी करेल काय ?

* इयत्ता पाचवी व आठवी वर्गातील मुलांची शिष्यवृत्ती अर्ज भरणे - या वर्षी नव्याने इयत्ता पाचवी व आठवी वर्गातील मुलांसाठी शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाइन पध्दतीने भरायचे आहे त्यासाठी परत मुख्याध्यापकाना वेठीस धरल्या जात आहे. शासन काही प्रमाणात स्वतःच्या कार्यालयातील ऑनलाइनची कामे कमी करून राज्यातील मुख्याध्यापक संख्येचा वापर करीत आहे जे काम शासकीय कार्यालयतील कर्मचारी करणे आवश्यक आहे ते काम शिक्षक आणि मुख्याध्यापक यंत्रणेकडून करवुन घेतल्या जात आहे. म्हणजेच आपला पैसा, वेळ आणि धावपळ वाचवीत आहे.याचा त्रास मात्र सर्वात खालच्या स्तरावरील शिक्षक व मुख्यध्यापकास होत आहे याची कोणाला तरी काळजी आहे काय ? भरीस भर म्हणून यावर्षी इयत्ता पाचवी वर्गासाठी असलेल्या नवोदय परिक्षेचे आवेदन पत्र देखील ऑनलाइन भरण्याचे आदेश येऊन धडकले आहेत, त्यामुळे अजुन एक ऑनलाइन कामात वाढ झाली आहे.

* शालेय पोषण आहार रोज ऑनलाइन करणे - शालेय पोषण आहार योजना शाळेचा एक अविभाज्य घटक बनले आहे. फार पूर्वी तीन किलो तांदुळ पाकिट वाटप केल्या जायचे त्यात कसल्याच प्रकारची किटकिट नव्हती. पण सन 2003 पासून राज्यात इयत्ता पहिली ते पाचव्या वर्गात शिकणाऱ्या मुलांना शालेय पोषण आहार योजने अंतर्गत मध्यान्ह भोजन चालू केली. तेंव्हापासून आजपर्यन्त ही योजना वळण घेत घेत आज रोजच्या रोज ऑनलाइन उपस्थिती नोंद करणे बंधनकारक करण्यात आले. रोजच्या रोज उपस्थिती ऑनलाइन नोंद करणे शाळेवर खूप अवघड काम आहे. पण याची साधी दखल कुणी घेत नाहीत. ऑनलाइन काम झाले पाहिजे असा आदेश मात्र कडकरित्या दिला जातो. एवढं करून त्या शालेय पोषण आहार योजनेतील कामगारांना एक तारखेला वेतन देता येईल काय ? याबाबत मात्र कुठे ही विचार केला जात नाही.

* शालार्थ प्रणालीद्वारे शिक्षकाचे पगार मागविणे - पूर्वीचा एक काळ होता जेथे केंद्रीय मुख्याध्यापक बँकेतून सर्व शिक्षकाचे पगार उचलत असे आणि वाटप करीत असे. अनेक ठिकाणी या बाबतीत गैरव्यवहार झाले म्हणून सर्व शिक्षकाचे वेतन बँकेतून त्याच्या वैयक्तिक खात्यात जमा करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली. सुरुवातीला केंद्रीय मुख्याध्यापक हाताने लिहून वेतन देयक गटविकास कार्यालयात सादर करायचे आणि गटविकास अधिकारी आपल्या स्वाक्षरीने वेतन अदा करीत असत. पण या प्रक्रियेत बदल करण्यात आला आणि ऑनलाइन पध्दतीने वेतन करण्याचे सुरु करण्यात आले. ज्यात प्रत्येक शाळेचा मुख्याध्यापक हा वेतन अदा करणारे मुख्य झाले. अर्थातच प्रत्येक शाळेचा ऑनलाइन वेतन करण्यात आले आणि त्यास मुख्याध्यापक जबाबदार घटक करण्यात आले. येथे सुध्दा ऑनलाइन प्रक्रियेमुळे मुख्याध्यापक सध्या हैराण होत आहेत. एवढे असून कागदाचा ससेमिरा काही कमी झाला नाही तसेच महिन्याच्या एक तारखेला पगार करायचे स्वप्न अजून तरी पूर्णत्वास गेले नाही.

* विद्यार्थी ऑनलाइन फॉरवर्ड करणे - गावातील शाळेतील शेवटचा वर्ग संपल्यानंतर किंवा कोणी आपली शाळेतील TC काढल्यानंतर तो दुसऱ्या शाळेत प्रवेश घेतो तो कागदावर तात्पुरते कारण जोपर्यन्त ऑनलाइन विद्यार्थी या शाळेतुन त्या शाळेत ट्रान्सफर होत नाही तोपर्यन्त पुढील शाळेला काहीच करता येत नाही. हे सुद्धा ऑनलाइन. शाळेची संचमान्यता देखील विद्यार्थी पोर्टल वर अवलंबून आहे. शाळेत विद्यार्थी नसेल तर चालेल पण तो ऑनलाइन वर असेल तरच शिक्षक संख्या मिळेल अन्यथा नाही अशी अट सध्या संच मान्यतामध्ये टाकली आहे. भविष्यात शाळेतील शिक्षकांची उपस्थिती आणि त्यांची अध्यापन प्रक्रिया सुध्दा ऑनलाइन झाल्यास काही आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. ही सर्व कामे ऑनलाइन करायची आहेत त्यासाठी प्रत्येक मुख्याध्यापक स्मार्टफोनधारक आहे ही एकच जमेची बाजु आहे परंतु सर्वाना हे स्मार्टफोन वापर करता येईल याची खात्री नाही त्यामुळे त्याचा फायदा सरकारी लोकासोबत खाजगी व्यावसायिक लोक घेत आहेत. हे सर्व ऑनलाइन झाल्यामुळे आणि शाळा ऑफलाइन असल्यामुळे मुख्याध्यापकाना खाजगी व्यावसायिक लोकांकडे जाण्याशिवाय पर्याय नाही त्यामुळे शाळा प्रमुखाला रोज ऑनलाइन प्रक्रियेसाठी महीनाकाठी जवळपास एक ते दोन हजार रुपयांच्यावर खर्च करावा लागत आहे. यासाठी शासनाची निधी मात्र तूटपूंजी आहे असे म्हणण्यापेक्षा नसल्यातच जमा आहे. एखादी गोष्ट ऑनलाइन करण्यात आले नाही की मुख्याध्यापकाना नोटीस मिळालीच म्हणून समजा. आज काही शाळेत संगणक तर दुरची गोष्ट त्यांच्याकडे विद्युत पुरवठाही सुरळीत सुरु नाही. संगणक आहेत परंतु लाईट नाही असे काही ठिकाणी आहे तर काही ठिकाणी संगणक चालवू शकणारे कुशल प्रशिक्षित शिक्षक नाहीत अशी फार मोठी विचित्र परिस्थिती शाळाची आहे याची जाणीव शासन दरबारी नसेल काय ? असा प्रश्न कधीतरी मनात निर्माण होतो. ऑनलाइन प्रक्रियेतील प्रत्येक प्रणालीचे यूजर नेम आणि पासवर्ड लक्षात ठेवणे अशक्य होत आहे. त्यामुळे मुख्याध्यापकाना डोके खाजविण्याची वेळ आली आहे. शाळेत कसल्याच प्रकारची सुविधा न देता

ऑनलाइन कामाची अपेक्षा ठेवणे खरोखर योग्य आहे का ? काहीही करा पण ही कामे ऑनलाइन करावीच लागतील असा आदेश दिल्या जातो. डिजिटल तंत्रज्ञानामुळे आज सरकारी शाळा आणि सरकारी शिक्षक हायटेक झाली आहेत मात्र तंत्रस्नेही शिक्षक बांधवाची संख्या तुलनेने खुप कमी आहे याचा शासन स्तरावर एकदा तरी विचार करावा असे वाटते. एवढे सर्व ऑनलाइन कामे शाळेच्या मुख्याध्यापकानी कसे करावे हा फार मोठा प्रश्न त्याच्या समोर पडला आहे. सध्या तरी खाजगी बाहेरील व्यक्तिकडे म्हणजे कंप्यूटर सेंटरमध्ये जाण्याशिवाय पर्याय नाही त्यामुळे मुख्याध्यापक हे दिवसा शाळेत आणि सायंकाळी कंप्यूटर सेंटर मध्ये दिसत आहेत. नुकतेच विविध जिल्ह्याच्या शिक्षक संघटना किंवा मुख्याध्यापक संघ यांनी ऑनलाइन कामाला विरोध दर्शविले आहेत. त्यामुळे यापुढे शिक्षक मंडळी मुकी बिचारी कुणी ही हाका या धोरणाने चालणार नाही, असे तरी चित्र सध्या पहायला मिळत आहे. यावर शासन उपाय करू शकते त्यासाठी हवी शासनाची उपाययोजना करण्याची इच्छाशक्ती. आज राज्यात किती तरी संगणक ऑपरेटर बेकार फिरत आहेत त्यांच्या हाताला काम उपलब्ध करून दिल्यास बरेच बेरोजगार मुले कामाला लागु शकतात. प्रत्येक केंद्रीय शाळेवर एका संगणक तज्ञाची तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक केली आणि केंद्रांतर्गत येणारी सर्व ऑनलाइनची कामे यांच्या मार्फ़त करून घेतल्यास बऱ्याच शिक्षकांचा त्रास वाचू शकतो. गटसाधन केंद्र म्हणजे तालुका स्तरावर एक पद सध्या आहेच त्यास एक मदतनीस म्हणुन जर एका पदाची निर्मिती करण्यात आली तर तालुक्याची सर्व कामे ऑनलाइन करण्यास काही अडचण येणार नाही. यामुळे सर्व शाळा संगणक युक्त आणि नेट असलेल्या असणे गरजेचे राहणार नाही. तालुका आणि त्याअंतर्गत येणारी केंद्रीय शाळेचा जरा गांभीर्याने विचार केला तर शासनाची ऑनलाइन प्रणालीला यश मिळेल असे वाटते अन्यथा असे ऑनलाइनचे काम म्हणजे केवळ फार्स असून निव्वळ मुख्याध्यापाकच्या डोक्याला ताप आहे.

## शाळा हेच विकासाचे केंद्र*

आज प्रत्येक मुलांचे पालक दहावी किंवा बारावी उत्तीर्ण आहेत, साक्षर आहेत, समझदार आहेत. ते आपल्या मुलांना घरच्या घरी शिकवू शकतात. तरी आपल्या मुलांना शिक्षणासाठी शाळेत का पाठवित असतील बरे ? हा प्रश्न कधी तरी आपल्या मनात येतो त्यावेळी आपण शाळेच्या बाजूनी विचार करायला सुरुवात करतो. समाजात शाळा असे एक केंद्र आहे ज्याठिकाणी मुलांचा सर्वांगीण विकास साधता येतो. जी मुले शाळेत जात नाहीत त्यांच्यावर कुठल्याही प्रकारचे संस्कार होत नाही म्हणून तो यशस्वी जीवन जगु शकत नाही. त्याउलट शाळेत शिकलेला व्यक्ती समाजाच्या चालीरीती समजून घेऊन चालतो. काही मंडळी शिकून सुध्दा अडाणी माणसासारखे वर्तन ठेवतात. त्यामुळे शिक्षण यंत्रणा बदनाम होते. सहज असे म्हटले जाते की शाळेत हेच शिकविले काय ? पण शाळेत खुप काही शिकायला मिळते म्हणून आजही शाळेचे महत्व अबाधित आहे.

सर्वात पहिल्यांदा शाळेत देशाच्या प्रति अभिमान जागृत केल्या जाते. स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात येते आणि त्यातून देशाभिमान जागे केले जाते. त्याच सोबत रोजच्या परिपाठमधून राष्ट्रगीताचे गायन केल्या जाते आणि देशाविषयीची आपली भावना मनात प्रज्वलित केली जाते. याच परिपाठामधून मुलांवर अनेक प्रकारच्या मूल्यांची संस्कार करण्याचे काम केल्या जाते. काही शाळेत परिपाठामध्ये विविध उपक्रमाची रेलचेल असते, जसे मुलांचा वाढदिवस साजरा करणे, रोज एक कथा सांगणे, मुलांनी केलेल्या चांगल्या कामाची स्तुती करणे, रोज एक गीत आणि प्रार्थना म्हणने, चालू घडामोडी किंवा सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्न विचारणे यासारख्या उपक्रमामुळे मुलांमध्ये नकळत वेगवेगळया संस्काराची रुजवण होते. त्यामुळे शाळेत सकाळी अर्धा तास किंवा वीस मिनीट चालणारा परिपाठ शाळेचा आत्मा असतो.

दिवसाची सुरुवात चांगली झाली तर शिक्षक आणि विद्यार्थ्यांना देखील पूर्ण दिवस चांगला जातो.

स्वच्छता आपल्या जीवनाचा अविभाज्य आणि आवश्यक बाब आहे. याची सुरुवात प्राथमिक शाळेत होते. येथे शिकणारी मुले कशाचेही विचार करीत नाही. शिक्षक जे सांगतील ते काम डोळे झाकुन करतात. तीच मुले मोठ्या वर्गात गेल्यावर मात्र एक पाऊल मागे येतात. म्हणून स्वच्छतेची शिकवण प्राथमिक वर्गात मिळणे अत्यावश्यक आहे अन्यथा मुलांना स्वच्छतेचे महत्व उभ्या आयुष्यात कळणार नाही. शाळेची सुरुवात स्वच्छतेने होते. बऱ्याच प्राथमिक शाळेत शाळा सफाई करण्यासाठी सेवक नसतो अश्या वेळी शाळेतील मुले स्वयंप्रेरणेने सफाई करण्यासाठी पुढे येतात. शाळेच्या मैदानातील सर्व केरकचरा साफ केल्या जाते आणि वर्गाची सफाई देखील केली जाते. ज्यातून मुलांच्या मनात स्वच्छतेविषयीची जागरूकता निर्माण करता येते. बहुतांश वेळा पालक वर्गातुन मुलांच्या हातून केलेल्या साफसफाईला विरोध केल्या जाते. हे बरोबर आहे किंवा चूक माहित नाही मात्र शिक्षकांच्या सूचना पूर्ण करण्याची अभिलाषा मुलांच्या मनात असते. यातून मुले आज्ञाधारक बनतात. शाळेत शिक्षकांची आज्ञा ऐकणारी मुले घरात देखील आज्ञाधारक होतात असा एक निष्कर्ष आहे. जे शाळेत ऐकत नाहीत ते घरी तरी काय ऐकतील प्रश्नच आहे. शाळेत विविध जाती-धर्माची मुले एकत्र बसतात आणि शिकतात. त्यामुळे खऱ्या अर्थाने इथे समानतेची शिकवण दिल्या जाते. मुलगा असो किंवा मुलगी प्रत्येकाना समान संधी दिल्या जाते. त्यामुळे कोणाच्याही मनात भेदभाव निर्माण होत नाही. पुस्तकामधून आणि विविध उपक्रमाच्या माध्यमातून मुलांवर समानतेची वागणूक कशी असावी हे नकळत शिकविल्या जाते. एकमेकाना मदत करण्याची प्रवृत्ती येथूनच तयार होते. या निरागस मुलांना समाजातील अनेक रूढी आणि परंपरा माहित नसतात. त्यामुळे या बालकाना समानतेची शिकवण देणे सोपे जाते. खेळाच्या माध्यमातून मुलांच्या आरोग्याकडे लक्ष दिले जाते. जीवनात अभ्यासासोबत खेळ देखील महत्वाचे आहे. खेळण्यातून मनोरंजन होते आणि अभ्यास करण्यासाठी स्फुर्ती मिळते. सदानकदा पुस्तकात डोके घुसवुन असलेला

मुलगा भविष्यात तंदुरुस्त असूच शकत नाही. विविध खेळ खेळल्यामुळे शरीर लवचिक होऊन मन ताजे राहण्यास मदत मिळते. याची खरी शिकवण शाळेत मिळते हे ही खरे आहे.

शाळेत जेवण्याचे सुध्दा शिकविले जाते हे वाचून आश्चर्य वाटेल, पण सत्य आहे. शाळेत जेव्हापासून शालेय पोषण आहार योजने अंतर्गत मध्यान्ह भोजन दिल्या जात आहे तेंव्हापासून मुलांनी जेवण्यात काय खावे आणि कसे खावे हे सुध्दा नकळत शिकविल्या जात आहे. जेवण्यापूर्वी हैण्डवॉशने हात स्वच्छ धुण्याची सवय शाळेत लावली जाते. मुलांना रांगेत उभे करून रोज हात स्वच्छ धुतल्याशिवाय दुपारी जेवायला मिळत नाही. ही सवय मुलांसोबत नेहमीसाठी राहते. घरी देखील मुले हात पाय स्वच्छ धुतल्याखेरीज जेवण करीत नाहीत. ही एक चांगली सवय शाळेतून लावल्या जाते. तशी ही सवय घरात आई बाबा नी लावलेली असते मात्र यात नियमितपणा शाळेत दिसून येतो म्हणून त्याची परिणामकारकता दिसून येते. जेवताना मांडी घालून बसावे, इतराना बोलू नये, डावा हात नेहमी हलवित ठेवावे त्यामुळे माश्या बसत नाहीत आणि अन्नावर लक्ष ठेवून जेवण करावें. ताटात जे येईल ते अन्न कुरकुर न करता खाण्याची सवय शाळेत लागते. बरेच आई वडील तक्रार करतात की, मुले घरी जेवण करीत नाहीत. मात्र तीच मुले शाळेत आपल्या मित्रांसोबत खुप छान जेवतात. म्हणून सुट्टीच्या दिवशी मुलांना त्यांच्या मित्रांसोबत एक वेळा जेवण देऊन पहावे काही फरक दिसतो का ? नक्की दिसून येईल. समुहात माणूस समुहासारखे वागतो. शाळेत होणारे विविध कार्यक्रम जसे जयंती, पुण्यतिथी, विशेष दिन आणि सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून मुलांच्या अभिव्यक्तीला वाव दिला जाते. विविध प्रकारच्या स्पर्धा घेतल्या जाते त्यामुळे हार जीत ची सवय लागते. यश मिळविणे सोपे आहे मात्र अपयश पचविणे फार कठीण असते. या सर्व बाबी अर्थात घरात शिकविल्या जाऊ शकत नाही म्हणूनच शाळेला माणसाच्या जीवन विकासाचे केंद्र असे म्हटले जाते.

# शिक्षक : समाजाचा खरा शिल्पकार

शिक्षण हे जग बदलण्याचे सर्वात प्रभावी शस्त्र आहे' असे नेल्सन मंडेला यांनी म्हटलेले आहे. शिक्षणाशिवाय व्यक्तीची प्रगती अशक्य आहे. शिक्षण प्रक्रियेतिल सर्वात महत्वाचा घटक म्हणजे शिक्षक. शिस्तप्रिय, क्षमाशील आणि कर्तव्यदक्ष असणाऱ्याना शिक्षक असे संबोधले जाते. देशाच्या जडणघडणीत आणि प्रत्येकाच्या जीवन विकासात शिक्षकांचे योगदान अत्यंत महत्वपूर्ण असे आहे. ज्या देशातील शिक्षक सर्वगुणसंपन्न असतात तेथील विद्यार्थी देखील सर्वगुणसंपन्न असतात. शिक्षक हा एखाद्या वृक्षासारखा आहे. ज्याच्या सावलीत ही मुले वाढत असतात. एखादी लहान सहान घटना घडली की प्रत्येकवेळी शिक्षकांच्या डोक्यावर खापर फोडले जाते. कारण ते जे धडे मुलांना देतील तेच धडे भविष्यात गिरविले जाते. म्हणून शिक्षकांनी कोणतीही गोष्ट करताना अत्यंत काळजीपूर्वक करावे लागते. बहुतांश वेळा एखादा शिक्षक चूक करतो मात्र समाजातील सर्व शिक्षकांना त्यासाठी दोषी ठरविले जाते. एका शिक्षकांने एका मुलींवर अतिप्रसंग केला असल्याची काही दिवसापूर्वी बातमी वाचण्यात आली होती. गुरु-शिष्याच्या नात्याला सदरील शिक्षकांने काळीमा फासले हे सत्य आहे. अश्या घटनामुळे समाजातील लोकांचा शिक्षकांवर असलेला विश्वास कमी होत जातो. आज ग्रामीण भागात माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या मुलींची संख्या का कमी होत आहे ? याचे संशोधन करणे आवश्यक आहे. तर उपवर आणि वयाने मोठ्या होत चाललेल्या मुलीविषयी पालक अधिक चिंतातुर होत आहेत. त्यात शिक्षकांच्या अश्या वागण्याने पालक मुलींना घरी ठेवणे पसंद करीत आहेत. शाळेत मुलींवर होणारे

अत्याचार खरोखर भविष्यात चिंता करणारी गोष्ट ठरणार आहे. त्यासाठी प्रत्येक शाळेने आपल्या शाळेत सीसीटीव्ही लावणे भविष्यात गरजेचे असेल असे वाटते.

संस्कारी शिक्षक - शाळेत चिमुकल्या मुलांना जीवनाचे धडे देणारे शिक्षक स्वतः संस्कारी असणे आवश्यक आहे. जे शिक्षक स्वतः संस्कारी नसतील त्यांच्या कडून अपेक्षा तरी काय ठेवावी. आडात नाही तर पोहऱ्यात कुठून येणार ? अशी स्थिती शिक्षकांची नसावी. बहुतांश वेळा असे बोलेल्या जाते की समाजाने शिक्षकांवर खुप बंधने टाकली आहेत. इतर विभागातील कर्मचारी कसा ही वागला तरी त्याच्याविषयी काही बोलेल्या जात नाही. मात्र शिक्षक मंडळीना सैराट वागुन चालत नाही कारण सर्व समाज त्यांच्याकडे वेगळया नजरेने पाहतात. म्हणून शाळेत वेळेवर येणारे, स्वच्छ पोशाखातील, मुलांना अध्यापन करणारे आणि गावातील लोकांशी प्रेमाने बोलणारे, निर्व्यसनी शिक्षक मुलांच्या आणि पालकांच्या गळयातील ताईत बनतात हे ही सत्य आहे. विद्यार्थ्यांना विचारप्रवृत्त करायला लावणे महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त अभिव्यक्त होण्याची संधी मिळायला हवे. आजचे शिक्षण वरवर विद्यार्थी केंद्रीत दिसत असले तरी ते शिक्षक केंद्रीत आहे हे स्पष्ट होते. शिक्षकांना स्वतःला ज्या गोष्टी विषयी आवड आहे ती बाब ते विद्यार्थ्यांना अगदी तन्मयतेने अध्यापन करतात. एखाद्या शिक्षकांस चित्रच काढता येत नसेल तर ते विद्यार्थ्यांना याविषयी कोणतेही ज्ञान देवू शकत नाही. असेच काही इतर विषयाच्या बाबतीत घडत असते. मात्र यास कोणी समजून घेत नाही ही शिक्षकांची खरी शोकांतिका आहे. प्राथमिक शिक्षक हा अष्टपैलू असला पाहिजे कारण सर्व विषयाचे थोडे थोडे ज्ञान असेल तरच विद्यार्थ्यांना ते देऊ शकतील. विषय शिक्षकांपेक्षा या प्राथमिक शिक्षकां ची व्यथा वेगळीच असते. शिक्षकांच्या प्रत्येक बाबीचे शाळेतील विद्यार्थी आणि गावातील जनता सूक्ष्म निरीक्षण करीत असतात. म्हणून शिक्षकांनी आपल्या प्रत्येक कृतीकडे लक्ष देणे गरजेचे आहे. जे शिक्षक विद्यार्थ्यांना शिकविण्यापेक्षा अभ्यास करण्याची प्रेरणा देतात तेच खरे आदर्श शिक्षक होत. वास्तव मात्र उलट दिसते. पालक आणि शासन

दोघे ही अभ्यासक्रम पूर्ण करा असा तगादा शिक्षकांच्या मागे लावतात. त्यामुळे शिक्षक अभ्यासक्रम कसा पूर्ण होईल याच गोष्टीकडे अधिक लक्ष देत असतो. त्यात शिक्षकांची काही एक चूक नाही मात्र प्रत्येकजण अभ्यासक्रमाच्या मागे हात धुवून लागल्यामुळे त्यांचा नाईलाज होतो. वास्तविक पाहता शिक्षकांच्या स्वतः च्या कल्पनाशक्तीने शिक्षण देण्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे असे वाटते.

जे शिक्षक समाजाचा विचार करून वागतात त्यांची समाजात पत वाढते. माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांनी एके ठिकाणी म्हटले आहे की, ‘ ‘सर्जनशीलता हे भविष्यातील यशाचे गमक आहे आणि प्राथमिक शिक्षक मुलांत सर्जनशीलता रुजविण्याचे कार्य करू शकतात ’’ प्राथमिक शिक्षकांशिवाय हे काम कोणीही करू शकत नाही. आज डिजिटलच्या जमान्यात भरपूर साधने उपलब्ध आहेत मात्र शिक्षकांची जागा कोणी ही घेऊ शकत नाही हे ही सत्य आहे. त्यामुळे आज समाजाला संस्कारी शिक्षकांचीच खरी गरज आहे. आज शिक्षक दिनानिमित्त सर्व शिक्षक बांधवाना हार्दीक शुभेच्छा ....!

# बदलत्या काळात शिक्षकांची भूमिका*

शिक्षक हा समाजसुधारणा करणारा देशातील सर्वात महत्वाचा समाजसेवक आहे. प्रत्यक्षपणे जरी नसेल तरी अप्रत्यक्षरित्या त्यांचा सहभाग अत्यंत महत्वाचे मानले जाते. अगदी पुरातन काळापासून गुरु किंवा शिक्षकांच्या कार्याचा मागोवा घेतला तर ही बाब नक्की आपल्या मनाला पटेल. प्राचीन काळात गुरुला फारच महत्वाचे असे स्थान होते. शिक्षक समाजात कश्याप्रकारे आपली भूमिका करीत असतो हे पाहणे आवश्यक आहे. रामायण आणि महाभारताच्या काळात गुरुच्या घरी म्हणजे गुरुकुलमध्ये जाऊन विद्या प्राप्त करण्याची पध्दत होती. घरापासून कोसो दूर असलेल्या आश्रमात शिष्य मंडळी आपले देहभान विसरून निसर्गरम्य वातावरणात गुरुनी दिलेली विद्या आत्मसात करीत. गुरुची आज्ञा न पाळणारा शिष्य शोधूनही सापडत नसे. जो व्यक्ती आपल्या गुरुच्या प्रति श्रध्दा ठेवतो त्याला नक्कीच विद्या प्राप्त होते असे त्याकाळचे गुरुवर्य मंडळी म्हणत. त्याकाळी गुरुना राजगुरु म्हणून त्यांना महत्वाचे असे पद होते. त्या काळातील राजे मंडळी सुद्धा गुरुच्या सल्या किंवा मार्गदर्शन घेतल्याशिवाय कोणतेच कार्य करीत नव्हते, एवढे त्यांचे महत्त्व होते. गुरुशिवाय कुठेही विद्या प्राप्त होत नाही, अशी परिस्थिती त्यावेळी होती. एकलव्य अशीच विद्या शिकण्यासाठी द्रोणाचार्यच्या गुरुकुल मध्ये गेले होते मात्र त्यास नकार मिळाला तेंव्हा त्यांनी द्रोणाचार्य गुरुचा पुतळा तयार करून विद्या प्राप्त केली. आपल्या मनात गुरुविषयी असलेली श्रद्धा आपणास ज्ञान देऊन जाते यांची शिकवण मिळते. पूर्वीच्या काळी त्यांना जे ज्ञान मिळत होते ते अगदी मुखोद्गत पध्दतीने. कुठल्याही प्रकारची लिखित सामग्री तेंव्हा उपलब्ध नव्हती. त्यामुळे त्यांना सर्व काही पाठांतर करावे लागायचे. पाठांतर करण्यासाठी रोजचा सराव अत्यंत महत्वाचे असते त्याशिवाय शक्य नाही. हा

सराव घरापासून दूर असेल तरच पूर्ण होऊ शकते हे ही सत्यच आहे. म्हणूनच ब्रह्मचर्य आश्रमची अवस्था पूर्ण होईपर्यंत गुरुच्या घरी विद्या प्राप्त करायचे ज्यात जीवन विषयक विचार आणि संस्काराच्या बाबी सांगितले जात असत. काळ थोडा पुढे सरकला. गुरुच्या घरी जाऊन शिक्षण घेण्याची प्रथा हळूहळू संपुष्टात येऊ लागली. प्रत्येकाला शिक्षण घेण्याचा मूळतः अधिकार आहे आणि ते त्याचा हक्क आहे ही बाब समोर येऊ लागली. तशी लोकांना आपल्या घराजवळ शिक्षण देणारी संस्था अर्थात शाळा अस्तित्वात येऊ लागल्या आणि सर्वांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्याचा विचार पुढे आला. याच विचारातून गाव तेथे शाळा स्थापन करण्यात येऊ लागले. भारत देशावर इंग्रज लोकांचे राज्य होते त्यावेळी त्यांनी फक्त मिशनरी शाळा चालू केल्या होत्या. त्यांना ऑफिस कामासाठी लागणारे कारकुन तेवढे निर्माण करण्याचा त्यांचा उद्देश्य होता. तेंव्हा या प्रक्रियेला महात्मा फुले यांनी तीव्र विरोध दर्शविले आणि हंटर कमीशनपुढे प्राथमिक शिक्षणाविषयी आपले मत व्यक्त करताना म्हणाले की, सहा ते चौदा वयोगटातील सर्व मुलामुलींना सरसकट मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण मिळावे. तळागाळातल्या आणि गोरगरीब पालकांच्या मुलामुलींसाठी त्यांनी शाळा उघडल्या. त्यांची पत्नी सावित्राबाई ही देखील त्यांच्या कार्यात मोलाची अशी भूमिका निभावली. भारताच्या शिक्षण विकास प्रक्रियेत फुले दाम्पत्यची खुप मोलाची कामगिरी आहे, ज्यास कोणतेही भारतीय नागरिक विसरु शकणार नाहीत. भारत देश इंग्रज्याच्या गुलामगिरीतून मुक्त झाल्यानंतर शासनापुढे पहिला प्रश्न होता तो भारतातील शिक्षण व्यवस्था कशी सुधारता येईल. देशात असलेली निरक्षरता आणि शाळेतून दिले जाणारे प्राथमिक शिक्षण ह्या दोन प्रमुख समस्या शासनासमोर आ वासून उभे होते. त्यासाठी गाव तेथे शाळा निर्मिती करणे आणि शाळेत शिकविण्यासाठी शिक्षकांची भरती करणे शासनास क्रमप्राप्त होते. परंतु शाळा शिकविण्यासाठी कोणीही पुढे येण्यास तयार होत नव्हते. याचा अनुभव महात्मा ज्योतिबा फुले यांना सन 1848 मध्ये त्यांनी जेंव्हा मुलीसाठी शाळा काढली. तेंव्हा शिकविण्यासाठी कोणी ही पुढे येत नव्हते.

त्यावेळी त्यांनी आपली निरक्षर पत्नी सावित्रीबाई फुले हिला अक्षर ज्ञान देऊन देशातील पहिली मुख्याध्यापिका होण्याचा सन्मान मिळवून दिला. स्वातंत्र्यानंतर देखील परिस्थिती मध्ये काही बदल झाला नाही कारण त्याकाळी उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी असे समजले जायचे. सरकारी नोकरी करणे बहुतांश लोकांना गुलामगिरी सारखे वाटत होते त्यामुळे शाळेत शिक्षकांची वानवा असायची. सातवी उत्तीर्ण झालेल्याना सुद्धा नोकरी मिळत असे. आज परिस्थिती त्याउलट आहे. लोकसंख्या वाढल्यामुळे नोकरी मिळणे खुप जिकरीचे बनले आहे. त्याकाळी ज्यानी ज्यानी नोकरीला नकार दिली होती ती मंडळी आज पश्चाताप करताना आढळून येतात. त्याकाळी शिक्षकांना शाळेत शिकविताना अनेक समस्याना तोंड द्यावे लागले. जसे की बऱ्याच गावात शाळेला स्वतः ची इमारत नव्हती. झाडांखाली शाळा भरविली जात होती. तर काही ठिकाणी ग्रामपंचायतीच्या कार्यालयात तर काही ठिकाणी गावातील पाटलांच्या वाड्यात शाळा भरत असे. ग्रामीण भागातील शाळांची स्थिती खुपच भयानक अशी होती. दळणवळणाची सुविधा नसल्यामुळे शिक्षकांना त्याच गावात रहावे लागायचे. आपल्या कुटुंबापासून दूर राहत असल्यामुळे त्यांची मानसिक स्थिती तेवढी चांगली राहत नव्हती किंवा ते इतर वाईट व्यसनाला बळी पडलेले अनेक उदाहरण यापूर्वी अनुभवण्यास मिळाले आहे. याच संदर्भात श्रीराम लागू यांचा पिंजरा हा चित्रपट खुप काही सांगून जातो. कठिण आणि विपरित परिस्थिती मध्ये देखील त्याकाळातील शिक्षकांनी ज्या पध्दतीने अध्यापनाचे कार्य पूर्ण केले ते खरोखरच नोंद घेण्यासारखी आहे. कसल्याही प्रकारची सुविधा किंवा साधने उपलब्ध नसताना त्यांनी अध्यापनाचे उत्कृष्ट कार्य केले आहे एवढे मात्र खरे. मात्र आज तशी परिस्थिती नाही. प्राचीन काळाप्रमाणे आजची शिकण्याची आणि शिकविण्याची पध्दत नक्कीच नाही. काळानुरूप गुरु आणि शिष्य यांच्यात खुप बदल झालेला आहे, हे मान्य करावेच लागेल.

आज सर्वत्र सुखसोयीची साधने, दळणवळण करण्यासाठी गतिमान अशी व्यवस्था निर्माण झाली. सर्वात महत्वाचे म्हणजे पूर्वीसारख्या शाळा आज बघायला मिळत नाहीत. सर्व शिक्षा अभियान अंतर्गत झाडांखाली भरणाऱ्या सर्व शाळा आत्ता भव्य दिव्य ईमारत जरी नसेल तरी चार भिंतीच्या आत भरल्या जात आहे. शालेय वातावरणात शिक्षकांच्या सहवासात वाढणारी ही चिमुकली मुलेच देशाचे खरे आधारस्तंभ आहेत. त्यांच्यावर योग्य संस्कार टाकून गुणवत्ता पूर्ण पिढी तयार झाली तरच देशाची प्रगती संभव आहे. मुलांवर संस्कार टाकण्याची जबाबदारी जेवढी कुटुंबातील आई-वडिलांची आहे तेवढीच शिक्षकांचीपण आहे. शिक्षकांना यात हात झटकून मोकळे होता येणार नाही, हे सत्य आहे. शिक्षकी पेशा हा एक असा व्यवसाय आहे जो जिवंत माणसांशी संबंधित आहे. एखादे वेळी अभियंता एखादी चूक केली तर थोडा फार नुकसान होईल मात्र एखाद्या शिक्षकांने शिष्याना विद्या प्रदान केली नाही तर त्याची पिढी बरबाद होईल. शिवाय त्या नंतर ची पिढी देखील बरबाद होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यास्तव शिक्षकांनी आपल्याजवळ असलेले अचूक ज्ञान मुलांना देणे आवश्यकच नसून अत्यंत महत्वाचे देखील आहे. ज्ञान ही एकच अशी वस्तू आहे जी की दिल्याने वाढत जाते आणि नुसते साठवून ठेवले तर गंजून जाते, म्हणून त्याचा नियमित वापर होणे आवश्यक आहे.

सध्या शाळेत सर्व प्रकारच्या सुविधा निर्माण झाल्या आहेत. खडू - फळा मोहिम मागे पडली असून मोबाईल संगणकाच्या मदतीने शाळा चालविले जात आहेत. राज्यातील बहुतांश शाळा डिजिटल झाले आहेत. त्या शाळेत मुलांना संगणक आणि प्रोजेक्टरद्वारे शिकविले जात आहे. दृकश्राव्यच्या माध्यमातून मुलांना दिलेले ज्ञान लवकर आत्मसात करता येऊ शकते. मात्र सदरील ज्ञान देण्याची क्षमता / कुवत शिक्षकांमध्ये असणे आवश्यक आहे. या बदलत्या काळात शिक्षकांनी आपले ज्ञान अपडेट केले नाही किंवा जुनाट पध्दतीनुसार चालत राहिले तर जमणार नाही. काळाच्या गतीनुसार जो पाऊले उचलतो तोच त्या प्रवाहात राहू शकतो अन्यथा बाहेर फेकल्या जाऊ शकतो. चाळीशी ओलंडलेले शिक्षक मंडळी आत्ता संगणक

शिकून काय करायचे आहे ? अशी भूमिका घेतात. मात्र हे शिकणे शिक्षकांसाठी नसून शाळेत शिकणाऱ्या मुलांना ज्ञान देता यावे यासाठी आहे, हे सर्वप्रथम ओळखून घ्यावे. म्हणूनच शासकीय कर्मचाऱ्यांना डिसेंबर 2007 पूर्वी संगणक प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण होणे सरकारने बंधनकारक केले होते. मात्र बहुतांश शिक्षक मंडळीनी आपले संगणक शिकणे पूर्ण केली नाही, हे खरे तर चिंतनीय बाब आहे. त्याशिवाय डिजिटल युगात आपले काही खरे नाही याची जाणीव सर्वप्रथम शिक्षकांना होणे अत्यावश्यक आहे. सध्याच्या काळातील मुले डिजिटल तंत्रज्ञानाच्या बाबतीत खुप पुढे गेलेली आहे. शिक्षकांनी काही गोष्टी माहित नसलेल्या बाबी मुलांना माहित आहेत. पूर्वी फक्त गुरु किंवा शिक्षक तेवढेच ज्ञान देऊ शकत होते. मात्र आज तशी परिस्थिती नाही. आज ज्ञान मिळविण्याचे वेगवेगळे माध्यम उपलब्ध झाली आहेत. संगणक किंवा टीव्हीच्या माध्यमातून खुप ज्ञान मिळत आहे. सर्वत्र स्पर्धा वाढली आहे. जे चांगले शिकवितात त्यांच्या शाळा टिकून आहेत तर जे काही मेहनत घेत नाहीत तेथील शाळेची संख्या रोडावत चालली आहे. संसदेत जसे आमदार आणि खासदार पळविले जातात तसे एकमेकाच्या परिसरातील शाळेवाले विद्यार्थी पळवित आहेत. आज शिक्षकांना आपले स्थान टिकविण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे, ही बाब काय दर्शविते ? भविष्यात शिक्षकांची पदे अत्यंत धोक्यात आहेत. पूर्वी सारखे सरकारचे जावई म्हणून निश्चितपणे वावरता येणार नाही. शिक्षकांनी बदलत्या काळातील आपली बदललेली भूमिका लक्षात घेऊन वागले तरच टिकाव लागेल अन्यथा आपले जीवन अंधकारमय होण्यास वेळ लागणार नाही. थांबला तो संपला हे गृहीत धरणे साहजिक आहे.

## विद्यार्थी अप्रगत का राहतो ?

प्रथम नावाच्या संस्थेने असर अहवाल प्रसिद्ध केला ज्याद्वारे राज्यात अजूनही तिसरीत गेलेल्या ४१ टक्के आणि पाचवीतील ३८ टक्के मुलांना दुसरीच्या क्षमतेचे वाचन करता येत नाही. तर याच वर्गातील २० टक्के मुलांना कोणतेच गणित येत नसून ३ टक्के मुलांना संख्येचे ज्ञानही नाही. यामुळे ही मुले शिक्षण घेत असताना निरक्षर ठरली आहेत. असरच्या म्हणण्यानुसार राज्यात जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये २०१४ च्या तुलनेत काही चित्र बदलत आहे, ही स्वागतार्ह बाब आहे. पाचवीतील ५१.७ टक्के मुलांना दुसरीच्या क्षमतेचा परिच्छेदच नीट वाचता येत नव्हता. ते प्रमाण २०१६ मध्ये ११ टक्क्यांनी वाढून ६२.७ इतके झाले आहे. तर देशातील शाळांमध्ये हे प्रमाण केवळ ०.६ टक्के इतके कमी झाले असून आहे. अजूनही देशातल्या पाचवीच्या वर्गातील ४२.६ टक्के मुलांनाच नीट पुस्तक वाचता येत नाही. म्हणजेच राज्यातील स्थिती थोडी सुधारली असली तरी देशात हे चित्र अजूनही भयावह आहे. हे अहवाल पाहून शासनाने दोन वर्षापूर्वी जलद प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम घेण्याचे ठरविले आहे. ज्या अंतर्गत सध्या राज्यात सर्व मुले प्रगत व्हायला पाहिजे यासाठी विविध प्रकारचे उपक्रम आणि कार्यक्रमाची आखणी केल्या जात आहे. तरी सुद्धा काही मुले अप्रगत राहतात असे का होते ? संस्थेने ज्या प्रकारे राज्यातील विद्यार्थीची स्थिती निदर्शनास आणली तसे राज्यातील शिक्षकांची स्थिती कशी आहे ? शिक्षक कोणत्या परिस्थिती मध्ये शिकविण्याचे काम करीत आहे हे ही दाखवून द्यायला हवे म्हणजे विद्यार्थी अप्रगत का राहतो हे ही कळले असते. विद्यार्थी अप्रगत का राहतात ? याचा विचार केल्यास खालील बाबी प्रामुख्याने निदर्शनास येतात.

मुलांची सतत अनुपस्थिती ग्रामीण भागात शाळेत सतत अनुपस्थित राहणाऱ्या मुलांची संख्या लक्षणीय असते. विविध कारणामुळे विद्यार्थी शाळेबाहेर राहत असेल तर अश्या मुलांना प्रगतीच्या प्रवाहात आणणे खुप कठिन होऊन बसते. शेतात गुरे चारविण्यासाठी सर्रास शाळकरी मुलांचा वापर होतो. स्वतः पालक शाळेत येऊन सुट्टी मागतात तेंव्हा काय म्हणायचे. पालक एकदा सुट्टी मागायला येतो मात्र त्याचा गैरफायदा मुले भरपूर वेळा घेतात. शिक्षक देखील या गोष्टीकडे काना डोळा करतात. तेंव्हा अर्थातच ही मुले प्रगत होतील काय ? काही मुलीं घरातील छोटे मोठे काम करण्यासाठी आई ला मदत करतात. काही जण घरातील लहान भावंडे सांभाळण्याचे काम करतात. त्यासाठी ते शाळेची पर्वा करीत नाहीत. या वयात त्यांना त्याची गोडी वाटते.

लहान वयात मुलांना प्रवेश - वयाची सहा वर्षे पूर्ण झालेला विद्यार्थी पहिल्या वर्गात प्रवेश घेणे ही चांगली बाब आहे. मात्र पालक वर्ग विविध कारणामुळे अगदी लहान वयात मुलांना शाळेत प्रवेश देतात. त्यांच्या वयाशी अनुकूल अभ्यासक्रम नसल्यामुळे ही लहान वयातील मुले गोंधळून जातात आणि शिक्षकांच्या अध्यापन प्रक्रियेला प्रतिसाद देत नाहीत. त्यांच्या मनगटमध्ये अक्षरे लेखन करण्याची शक्ती आलेली नसते. पण शाळेतील विविध योजनेचा फायदा मिळावे या हेतुने काही पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवितात. त्यांना शिक्षणाविषयी काही देणे घेणे राहत नाही. ही मुले हळूहळू वरच्या वर्गात ढकलली जातात आणि त्यांना काहीही समजत नाही, मग हे विद्यार्थी त्या त्या वर्गात अप्रगत राहतात. पुढे किती जरी प्रयत्न केले तरी ते प्रगत होतच नाहीत. काही ठिकाणी 100 टक्के विद्यार्थी प्रगत झाले आहेत म्हणून दाखविले जाते त्या ठिकाणी असे विद्यार्थी कदाचित लपविले जात असतील. लहान वयात मुले शाळेत प्रवेश न करण्याबाबत पालकांचे उदबोधन करणे आवश्यक आहे.

पालकांची शिक्षणाविषयी अनास्था भारत स्वातंत्र्य होऊन सत्तर वर्षे संपली, तरी पालकाना शिक्षणाचे महत्त्व अजुन देखील कळले नाही. महात्मा फुले

आणि सावित्रीबाई फुले यांनी जनतेच्या शिक्षणासाठी किती हालअपेष्टा सहान केल्या यांची जाणीव कोणी ही ठेवत नाहीत. शिक्षण हे जीवन विकासाचे प्रमुख साधन आहे असे अनेक तज्ञानी सांगितले आहे मात्र त्याचे कोणी ही विचार केला नाही त्यामुळे स्वातंत्र्यापूर्वी जी अवस्था त्यात काही क्रांतीकारक बदल झाला नाही. त्यांनी शिक्षणाकडे दुर्लक्ष केल्यामुळे आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे तेवढे लक्ष देत नाहीत जेवढे द्यायला हवे. स्वतः अक्षरशत्रू असल्यामुळे आपल्या मुलांच्या शिक्षणाविषयी त्यांच्यात काहीच जाणीव दिसत नाही. अशा पालकांची मुले अभ्यासात मागे दिसून येतात.

विविध आजारामुळे पावसाळयाच्या दिवसात कॉलरा, टॉयफाईड, डेंग्यू, पोटाचे विकार वाढलेले दिसून येतात. या विविध प्रकारच्या आजाराला शालेय विद्यार्थी मोठ्या प्रमाणात बळी पडतात. आजारी पडल्यानंतर निदान आठ दिवस तरी पालक विद्यार्थ्यांना शाळेत पाठवित नाहीत. आठ दिवसातील अभ्यास त्याच्या डोक्यावरुन जाते. त्याच्यात न्यूनगंड निर्माण होते. त्यामुळे तो नेहमी सर्वांच्या मागे राहतो. घरचे मंडळी देखील त्याची अति काळजी घेतात त्यामुळे मुलांचे फाजिल लाड केल्या जातात. या सर्व बाबीचा परिणाम मुलांच्या गुणावत्तेवर होत असतो.

गतिमंद मुले जी मुले सर्वसाधारण असतात ती मुले सांगितलेल्या गोष्टी पटकन आत्मसात करतात. शिक्षकांच्या बोलण्याला लगेच प्रतिसाद देतात. एक एक टप्पा समजत गेला तर त्याची प्रगती होत राहते. मात्र काही विद्यार्थी असे ही असतात की, दहा वेळा जरी समजावून सांगितले तरी त्यांना कळत नाही. ते गतिमंद असतात. सर्वसामान्य विद्यार्थ्याप्रमाणे शिकवून जमत नाही. अश्या विद्यार्थ्यांसाठी जाणीवपूर्वक वेगळे प्रयत्न करावे लागते. त्यासाठी वेळ ही भरपूर लागतो. शासनाने अश्या मुलांना शिकविण्यासाठी फिरते विशेष शिक्षक पदाची निर्मिती केली आहे ते सुद्धा तोकडे पडत आहेत. अश्या विद्यार्थ्यांना विशेष शिक्षकच व्यवस्थितपणे शिकवू शकतात.

शैक्षणिक वातावरण नसणे ग्रामीण भागात आज ते शैक्षणिक वातावरण नाही जे की शहरी भागात बघायला मिळते. कोचिंग क्लासेस आणि अभ्यासिका यांचे प्रमाण शहरी भागात पावलो पावली दिसून येते तर ग्रामीण भागात शाळेत जे शिकविले तेच अंतिम असते. त्यांना कुठलीच सुविधा नसते. त्यामुळे ही मुले पर्यायाने जगाच्या तुलनेत मागे राहतात. ग्रामीण भागात असे वातावरण तयार करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकानी विचार करणे आवश्यक आहे. गावातील युवकानी यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे. आपल्या जवळ असलेल्या रिकाम्या वेळेचा सदुपयोग मुलांना विविध प्रकारचे ज्ञान देण्यात खर्ची घातली तर आपल्या मनाला खुप समाधान मिळेल. लोक काय म्हणतील याचा विचार करून गावातील कोणताच युवक पुढे येत नाही त्यामुळे गावातील शिक्षण विकासात आपले काहीच योगदान असत नाही. ग्रामीण भागातील मुले खुप हुशार आहेत, गरज आहे त्यांना तसे वातावरण तयार करून देण्याची.

शिक्षकांची कमतरता शाळेतील मुलांना शिकविण्यासाठी शिक्षकांची गरज भासते. प्राथमिक वर्गातील मुलांना तर वर्गाला एक शिक्षक असेल तर योग्य प्रकारे शिकविता येते आणि मुलांना समजून घेता येते. एक वर्ग, एक अभ्यासक्रम आणि एक शिक्षक यामुळे अनुकूल परिणाम बघायला मिळतात मात्र येथे नेहमी उलट घडते. काही ठिकाणी चार वर्गाला एकच शिक्षक असतो. त्याठिकाणी सर्वच्या सर्व विद्यार्थी प्रगत होतील काय ? शिक्षक म्हणजे काही जादूगर नाही की, जादुची छडी फिरविली की विद्यार्थी प्रगत झाला असे होते काय ? राज्यातील एक-दोन शाळेत कदाचित झाले ही असतील मात्र हीच मात्रा सर्व शाळांना लागू पडेल असे समजणे किती चुकीचे आहे. गेल्या पाच सहा वर्षापासून प्राथमिक शिक्षकांची भरती करण्यात आले नाही. जेवढे शिक्षक कर्मचारी आहेत तितक्याच लोकांवर काम करून घेत आहेत. शेतात तण वाढलेले आहे त्यासाठी मनुष्यबळ वापरावेच लागते अन्यथा ते तण पुढे पिकाला धोका देऊ शकतात. अगदी असेच लहान मुलांच्या बाबतीत

बोलता येईल. वास्तविक पाहता प्राथमिक वर्गासाठी शिक्षक संख्या ज्यास्त असेल तर विद्यार्थ्यांना शिकविण्याचा भार कमी होत जातो. परंतु ही बाब कोणी लक्षात घेत नाही. प्रत्येकाना वाटते की, प्राथमिक वर्गाला शिकविणे खुप सोपे आहे. मात्र जावे त्याच्या वंशा तेंव्हा कळे या उक्तीनुसार प्राथमिक वर्गात जाऊन उभे राहिल्याशिवाय कळणार नाही.

उदासीन शिक्षक विद्यार्थी अप्रगत राहण्यास सर्वात जास्त दोष शिक्षकांवर ठेवला जातो. शिक्षकां नी मनावर घेतले तर काही ही सिद्ध करता येते. अवघड काम सुद्धा सहज करता येते. त्यासाठी हवी ईच्छाशक्ती आणि काम करण्याची आवड. असे बोलल्या जाते की आवड असली की सवड निर्माण होते. व्यक्ती आवडी चे काम मन लावून करतो तर सक्ती चे काम करतांना कंटाळा करतो. सर्वच शिक्षक कंटाळा करतात असे नाही मात्र काही शिक्षक मंडळी कामात कुचराई करतात ज्यामुळे मुले प्रगत होत नाहीत, असे प्रथमदर्शनी दिसून येते. शिक्षकां नी अथक प्रयत्न केल्यावर त्या मुलांना वाचन आणि लेखन आले नाही तर त्यात विद्यार्थ्याचा दोष समजून घेता येईल. त्यासाठी शिक्षकांचे प्रयत्न दिसणे आवश्यक आहे.

नापास न करण्याचे धोरण शासनाने शिक्षण अधिकार कायद्यामध्ये इयता पहिली ते आठवी वर्गात शिकणाऱ्या मुलांना अनुत्तीर्ण न करण्याचे धोरणामुळे देखील अप्रगत असलेली विद्यार्थी पुढच्या वर्गात दाखल होत आहेत. दरवर्षी वर्ग वाढत चालले मात्र गुणवत्तेत कसलाही फरक पडत नसल्यामुळे ही समस्या वरचेवर गंभीर बनत चालले आहे. नापास झाल्या मुळे विद्यार्थ्यामध्ये न्यूनगंड निर्माण होते हे जेवढे सत्य आहे तितकेच अभ्यास न करता किंवा शाळेत सतत अनुपस्थित राहून ही वरच्या वर्गात विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यास समाजात याचा काय संदेश जाईल ? याचे ही विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

# ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षण

ग्रामीण भागात शिक्षणाची अवस्था खुप वाईट स्थितीमध्ये असल्याचे प्रत्येकांच्या बोलण्यातून स्पष्ट होते. आज राज्यात गाव तेथे शाळा आहे म्हणजे प्रत्येक गावात कमीत कमी चौथ्या वर्गापर्यंतची शाळा अस्तित्वात आहे. जिसका कोई नहीं उसका सरकारी स्कूल ही आधार है, अशी सध्या तरी स्थिती आहे. इंग्रजी माध्यमाच्या किती ही शाळा रोज नव्याने जरी निर्माण झाले तरी सरकारी शाळेचे महत्त्व काही कमी होत नाही. याच सरकारी शाळेत शिकलेले अनेक अधिकारी आज मोठ्या पदावर काम करीत आहेत. माणसाच्या संपूर्ण जीवनात प्राथमिक शिक्षण जेथे पूर्ण झाली ती शाळा कधीही विसरु शकत नाही. योग्य संस्कार करण्याचे एक संस्कारी केंद्र म्हणजे प्राथमिक शाळा. जेथे जीवनातील अनेक लहान सहान बाबी शिकविल्या जाते. अभ्यासात हुशार असो वा नसो पण व्यक्ती सुसंस्कारी असेल तर यशस्वी जीवन जगु शकतो. माणसाचे चारित्र्य शुध्द असेल तर त्यास कुठे ही सन्मान आणि गौरव मिळू शकते. चारित्र्य मिळविण्याचे काम शिक्षणातून मिळते. पण आज मुलांना प्राथमिक शिक्षण योग्य प्रकारे मिळत नाही अशी ओरड समाजातून होत आहे. त्यात तथ्य असू शकते आणि ते खरे असेल तर त्यास कारणेदेखील असू शकतात. ग्रामीण भागातील शाळेत त्या सुविधा मिळत नाहीत जे शहरी भागातील शाळेत मिळतात. तिथे विद्यार्थी संख्या भरपूर असून देखील तेथील मुले सर्व बाबतीत सर्वगुणसंपन्न असतात. इथे मात्र विद्यार्थी संख्या 10 च्या घरात असून देखील त्यांची स्थिती तेवढी चांगली नसते. कारण अपुरी शिक्षक संख्या असल्यामुळे एकाच शिक्षकांवर सर्व गोष्टीचे भार पडते. मुलांचे पालक जागरूक नसतात. खाजगी शाळेत मुलांना पाठवित असताना त्याची पूर्ण काळजी घेणारे पालक सरकारी शाळेत पाठविताना बेफिकिर राहतात. असे का ? या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी संशोधन करणे आवश्यक आहे असे वाटते. समाजात आज असे ही

पालक भेटतात मुलगा इंग्रजी शाळेत पाठवितात आणि मुलगी सरकारी शाळेत असे का ? असे जर विचारले तर फारच गमतीशीर उत्तर देतात. मुलीने किती शिकून काय फायदा आहे सर शेवटी ती लग्न झाल्यावर दुसऱ्यांच्या घरी जाणार ना. मुलगा शिकला, त्याला नोकरी लागली तर आपल्या घराची प्रगती होणार नाही काय ? अशी विचारधारा ठेवणाऱ्या पालकामुळे शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. आज कित्येक मुलीं शिकून मोठ्या पदावर काम करीत आहेत. त्यांचे पालक असे विचार केले असते तर समाजातील आजचे चित्र बघायला मिळाले असते काय ? सध्याच्या सरकारी शाळेत एक नजर फिरविली तर आठव्या वर्गापर्यंत मुलांपेक्षा मुलींची संख्या जास्त आहे. अभ्यासात सुद्धा मुलीं हुशार दिसून येतात. दहावी आणि बारावीच्या निकालावर एक नजर फिरविली तर लक्षात येईल की मुलींची उत्तीर्ण होण्याची टक्केवारी देखील मुलांपेक्षा जास्त आहे. म्हणजे मुलाकडे विशेष लक्ष देऊन सुद्धा त्याची प्रगती लक्षणीय नाही आणि मुलगी दुर्लक्षित असून देखील गुणवत्तेत ती पुढे आहे. म्हणून पालक वर्गानी या मुलामुलींत भेद न करता शिक्षण द्यायला पाहिजे ते ग्रामीण भागात दिसत नाही. गावात ज्या वर्गापर्यंत शाळा आहे तेथ पर्यंत मुलींचे शिक्षण पूर्ण होते. पुढील शिक्षणासाठी दुसऱ्यां गावी मुलींना पाठविले जात नाही. येथे सुद्धा विविध कारणे आहेत त्यावर आपणास बोलायचे नाही. तो एक स्वतंत्र विषय होऊ शकते. याचाच अर्थ त्या प्राथमिक शिक्षणावर ज्यांची गाडी थांबते त्यांची जीवनात काय प्रगती होणार ?. ते साक्षर असुन देखील निरक्षरा प्रमाणेच वागतात. मुलांना शिक्षणाच्या सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या जाते मात्र त्याचे वैयक्तिक अभ्यासावर मुळी लक्षच नसते. त्यामुळे देखील प्राथमिक वर्गात गुणवत्ता दिसून येत नाही. ग्रामीण भागात मुळात शैक्षणिक वातावरण नसल्यामुळे मुले रोजच्या अभ्यासापासून दूर राहतात. आई-बाबा शेतात काम करून सायंकाळी दिवे लावणीच्या वेळी घरी येतात. घरातले काम उरकुन जेवण केल्यावर शारीरिक थकव्यामुळे आपल्या मुलांना आज शाळेत काय झाले हे न विचारता झोपी जातात. ही एका दिवसाची कथा नसून रोजचीच कथा आहे. मुलांच्या शिक्षणाविषयी हे

पालक खुपच बिनधास्त असतात. त्यांना काहीच काळजी वाटत नाही. वेळ निघुन गेल्यावर मात्र पश्चाताप करतात. तेंव्हा काहीच करता येत नाही. इथे शाळेत जेवढे शिकायला मिळाले तेच त्यांच्यासाठी अंतिम असते.

शहरातल्या प्रत्येक प्राथमिक शाळेला बालवाडी किंवा अंगणवाडी जोडलेली असते जेथे तीन वर्षा पासून ते सहा वर्ष पूर्ण होईपर्यंत प्राथमिक वर्गास अनुकूल असे शिक्षण दिल्या जाते. त्यामुळे पहिल्या वर्गात प्रवेश घेणारे येथील विद्यार्थी प्रगत असतात. त्या उलट ग्रामीण भागात बघायला मिळते. ग्रामीण भागात देखील अंगणवाडी आहेत. तेथे सुध्दा तीन ते सहा वर्षातील मुले दररोज येत असतात. मात्र येथे मुलांना कुठलाही अभ्यासक्रम नसल्यामुळे अंगणवाडी उरल्या खाऊपुरते असेच म्हणण्याची वेळ आली आहे. वास्तविक पाहता अंगणवाडीमध्ये प्राथमिक माहिती मुलांना करून दिल्यास पहिल्या वर्गात काही कठिन जात नाही. पण अंगणवाडी आणि शिक्षण विभाग यांचे काहीही संबंध नसल्यामुळे पहिल्या वर्गात प्रवेश घेणारी मुले प्राथमिक माहिती देखील नसलेले मिळत आहेत. रोज शाळेत जाण्याची सवय लावणे हे काम देखील अंगणवाडीनीट करू शकत नाहीत हे अचानक केलेल्या अंगणवाडीतपासणी च्या वेळी अधिकारी लोकांना निदर्शनास आलेले आहेत. जोपर्यंत ग्रामीण भागातील अंगणवाडीमध्ये सुधारणा होणार नाही तोपर्यंत प्राथमिक शाळा पूर्णपणे प्रगत होईल याबाबत शंकाच आहे. शाळेच्या नियंत्रणाखाली अंगणवाडीचे कार्यक्षेत्र आल्या शिवाय त्यांच्यात काही सुधारणा होईल असे देखील वाटत नाही. सगळ्या गावात शाळेच्या आवारात अंगणवाडी भरविले जाते. मात्र शाळेचा आणि अंगणवाडीचा काही एक संबंध नाही. काही गावात अंगणवाडीशिक्षिका खुप मेहनत घेऊन मुलांना प्राथमिक शिक्षणाचे धडे देतात. तेथील मुलांची प्रगती शासनाने जसे ठरविले आहे अगदी तसेच तंतोतंत होत असते. विद्यार्थ्याच्या शैक्षणिक प्रगती मध्ये अंगणवाडीमधील शिक्षण खुप महत्वाचे आहे, असे वाटते.

# मोबाईल डिजिटल शाळा

डिजिटल म्हणजे काय ? असा प्रश्न आज प्रत्येक गावकऱ्याच्या मनात पडलेला आहे. कारण सर्वत्र डिजिटल शाळेचे वारे वाहत आहेत. राज्यातील एक तरी शाळा रोज डिजिटल होत असल्याची बातमी विविध वृत्तपत्रातून वाचण्यात येत आहेत. तंत्रज्ञानाचा वापर करणे म्हणजे डिजिटल होय. टीव्ही, रेडियो, संगणक, मोबाईल, प्रोजेक्टर, इंटरनेट ह्या सर्व बाबी डिजिटल मध्ये मोडतात. ज्याच्या शाळेत वरील सर्व बाबीपैकी काही साहित्य उपलब्ध असले की शाळा डिजिटल झाली असे म्हणायला काही हरकत नाही. शाळेच्या सर्व भिंती रंगवून बोलक्या करणे, वर्गातील फरशी ज्ञानरचनावादी पध्दतीने रंगविणे, मुबलक शैक्षणिक साहित्य मुलांना हाताळण्यास देणे या सर्व बाबी डिजिटलशी संबंधित आहेत. असे केल्यामुळे काय होते ? या प्रश्नाचे उत्तर सहज आणि सोपे आहे. मुलांना शाळेविषयी आकर्षण निर्माण होते, शाळेत त्यांची उपस्थिती वाढते, डिजिटल तंत्रज्ञानामुळे गुणवत्ता वाढू लागते. अर्थात त्याच मुळे प्रगत महाराष्ट्र घडू शकतो. शाळा डिजिटल झाली की ती शाळा प्रगत झाली असे समजायला हरकत नाही, अशी धारणा सध्या समाजात पसरली आहे. त्यामुळे जो तो आपली शाळा डिजिटल करण्यासाठी जीवाचा आटापिटा करीत आहे. मग ज्यांच्या शाळेत वरील पैकी काही ही उपलब्ध नाही, त्यांची शाळा डिजिटल नाही म्हणजे ती शाळा प्रगत नाही काय, असे समजायचे काय ? असा ही प्रश्न शिक्षकाच्या आणि पालकाच्या मनात येणे साहजिकच आहे. अर्थात त्यांचे उत्तर नाही असेच मिळते. अश्या शाळेत सुद्धा

डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करता येतो. आज प्रत्येक गावात मोबाईल नावाचे खिशात मावणारे छोटेसे तंत्रज्ञान प्रत्येकाजवळ आहे. असा एकही शिक्षक आणि पालक शोधूनही सापडणार नाही ज्याच्या जवळ मोबाईल नाही. सर्व शिक्षक तर स्मार्ट फोन धारक झाले आहेत. शिक्षकांजवळ असलेले मोबाईल नावाचे स्मार्ट फोन यासाठी वापरता येतो. त्याचा अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत कसा करावा ? हे संपूर्णपणे शिक्षकांच्या कौशल्यावर अवलंबून आहे. शिक्षकांनी जर ठरविले तर मोबाईल सुद्धा आपल्या शाळेसाठी डिजिटलचे माध्यम ठरु शकते. त्यासाठी आपणास मोबाईलवरील सर्व ॲप्स ची आणि त्याच्या वापराची माहिती सर्व प्रथम शिक्षकांनी करून घ्यावी. मग त्याचा हवा तसा वापर करू शकतो. उदहारणासाठी कुरहाड़ीचा वापर कळले तर त्याचा योग्य वापर करू शकतो अन्यथा त्याद्वारे लोकांचे मुंडके देखील कापता येतात. अगदी तसेच मोबाईलच्या बाबतीत म्हणता येईल. मोबाईल म्हटले तर चांगली सुध्दा आहे आणि वाईट ही. त्या साठी त्याचा सुयोग्य वापर कसा करता येईल याविषयी मित्रामित्रात चर्चा, संवाद, माहितीची देवाण घेवाण केल्यास त्याचा वापर करता येऊ शकेल.

मोबाईल रिकॉर्डिंग करणे - शाळेत जे मुले आहेत त्यांच्या आवाजात गाणी, गोष्टी, कथा, मराठी व इंग्रजी सारख्या भाषाविषयातील उतारा वाचन याचे मोबाईल रेकॉर्डिंग करून परत तेच मुलांना ऐकू घातल्यास मुले उत्साही होतात. त्यांचा आवाज त्यांना परत ऐकताना खुप आनंद वाटतो आणि त्याच सोबत काय चुकले हे ही कळते. शिक्षकांनी आपल्या आवाजात काही रिकॉर्डिंग करून मुलांना ऐकू दिल्यास या द्वारेही छान अनुभूती मुलांना देता येईल. नेटवर उपलब्ध असलेले काही कविता, गाणी, गोष्टी, प्रसंगानुरूप केलेले भाषणाच्या ऑडियो क्लिप मुलांना ऐकू दिल्यास ते ही तसे प्रयत्न करतात. एखादी वीडियो क्लिप वर्गात तयार करायची आणि परत दाखविले असता मुलांना खुप आनंद मिळतो.

मोबाईलवरील चित्र :- आत्ता फोटो काढणे मोबाइल मुळे अगदी सोपे झाले आहे. पूर्वीच काळात एखादे कार्यक्रम म्हटले की सर्वात पहिल्यांदा फोटोग्राफरला बोलविले जायचे. ग्रामीण भागात तर मिळायचे नाही त्यामुळे एखाद्या प्रसंगाचे अनुभव फोटो च्या माध्यमातून घेता येणे शक्य होत नव्हते. मात्र आज तशी परिस्थिती नाही. मोबाईलमधील कैमराच्या ऍप्स द्वारे आपण आपले प्रसंग मोबाईलमध्ये कैद करू शकतो. शाळेत विविध कार्यक्रमाच्या दरम्यान किंवा वर्गातील इतर प्रसंगी काढलेले फोटो मोबाईलच्या माध्यमातून मुलांना दाखवून त्या प्रसंगाची परत एकदा आठवण देऊ शकतो. त्यामुळे मुलांची स्मरणशक्ती विकसित करता येऊ शकते. मोबाईलवरील वीडियोद्वारे अनेक गोष्टी मुलांना दृश्य स्वरुपात दाखविले जाऊ शकते. शाळेतील काही प्रसंग किंवा घटनेचे वीडियो करून परत मुलांना तीच वीडियो दाखविले असता त्यातील चांगल्या-वाईट बाबी लगेच कळून येतात. सुधारणा करता येऊ शकते. अध्यापन प्रक्रियेत देखील याचा रंजकपणे वापर करून मुलांना वर्गात खिळवून ठेवता येते.

विविध ऍप्स :- सध्या मोबाईलवर विविध प्रकारचे ऍप्स उपलब्ध आहेत ज्याच्या आधारे शाळेतील काही बाबी पूर्ण करता येऊ शकतात. मुलांना त्यांच्या आधारावर अध्यापन प्रक्रिया सोपी आणि सुलभ करता येऊ शकते. मुलांना अध्यापन करताना काही समस्या निर्माण झाल्यास सध्या आंतर जाल मध्ये खुप संकेतस्थळ निर्माण झाले आहेत ज्याच्या मुळे प्रत्येक।समस्याचे निराकरण शक्य आहे. राज्यातील बहुसंख्य शिक्षकांनी स्वतः चे वेबसाइड आणि ब्लॉग तयार केले आहेत ज्यातून बरीच शैक्षणिक माहिती एका क्षणात आणि एका क्लिक वर मिळू शकते. फक्त त्याचा योग्य वापर करता आले की आपल्या शाळेतील मुलांना याच्या माध्यमातून समृध्द करता येऊ शकते आणि स्वतः सुध्दा.

अल्प परिचय

नाव : नागोराव सा. येवतीकर

पत्ता : मु. येवती पोस्ट येताळा ता. धर्माबाद जि. नांदेड

व्यवसाय : प्राथमिक शिक्षक

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिरली ता. बिलोली जि. नांदेड

जन्मदिनांक : 26 एप्रिल 1976

छंद : शालेय जीवनापासुनच लिखाण करण्याची फारच आवड त्यामुळे विविध वर्तमानपत्र, दैनिक, साप्ताहिक, मासिकात वैचारिक लेख लिहिण्याचा छंद आहे. जीवन-शिक्षण या शैक्षणिक मासिकातून सुध्दा यापूर्वी लेख प्रकाशित झाले आहेत. लहान मुलांसाठी सुध्दा छोटेखानी लेख लिहितात तसेच त्याना मनोरंजनातून शब्दसंपत्ती वाढवी यांसाठी विविध मनोरंजक शब्दकोडे तयार करतात. जे की दर रविवारी दैनिक देशोन्नतीच्या फनक्लब पेज वर गेल्या दीड वर्षापासुन क्रमशः प्रकाशित झाले आहेत.

*साहित्य प्रकार :- वैचारिक लेख शैक्षणिक, सामाजिक, आणि कौटुंबिक विषयावर वैचारिक लेख महाराष्ट्रातील दैनिक लोकमत, सकाळ, पुण्यनगरी, देशोंन्नती, सामना, एकमत यासारख्या वृत्तपत्रात प्रकाशित झाले आहेत. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचेकडून प्रकाशित होणाऱ्या जीवन शिक्षण या मासिकात ही लेख प्रसिध्द झाले आहेत. पुण्यातील सुप्रसिद्ध सामाजिक मासिक तुम्ही आम्ही पालक मध्ये नियमित स्तंभलेखन करीत असतो.

प्रसिध्द साहित्य (पुस्तके) :

1 ) पाऊलवाट वैचारिक लेखसंग्रह

2 ) संवेदना ई पुस्तक

3 ) मी एक शिक्षक ई पुस्तक

मानसन्मान/पुरस्कार :

1996 - मुंबई नागरिक नशाबंदी सप्ताह समिती कडून पोस्ट कार्ड स्पर्धेत सहभाग घेतले त्यानिमित्त महात्मा गांधीजीच्या जयंती निमित्ताने गुणगौरवार्थ प्रमाणपत्र

सन 2000 महाराष्ट्र राज्य प्रौढ शिक्षण संस्था राज्य साधन केंद्र औरंगाबाद साहित्य निर्मिती विभागाकडुन अंबाजोगाई येथील राज्यस्तरीय लेखक शिबिरात आणि उदगीर येथील नवसाक्षर साहित्य निर्मिती शिबिरात सहभाग

सन 2007 - अखिल महाराष्ट्र पत्रकार व पत्रलेखक संघ मुंबई यांचेकडून उत्कृष्ट लेखनाबद्दल प्रसिद्ध लेखिका श्रीमती विजया वाड यांच्या हस्ते नांदेड येथे राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार प्रदान

सन 2008 - महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्याकडून आयोजित जीवन शिक्षण लेखन कार्यशाळेत नांदेड जिल्ह्यातून सहभाग

08 मे जागतिक रेडक्रॉस दिनानिमित्त नांदेडच्या इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या रौप्य महोत्सवी वर्षांनिमित्त आयोजित *रक्तदान सर्वश्रेष्ठ दान* या विषयावर जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकर परदेशी यांच्या हस्ते सन्मानपत्रासह प्रदान

पुण्याच्या जीवन शिक्षण प्रणाली तर्फे आयोजीत राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत सहभाग.

पंचायत समिती प्रशासनाने कार्याची दखल घेऊन डिसेंबर 2014 मध्ये गुरु गौरव पुरस्कार देऊन सन्मान केला.

जानेवारी 2015 मध्ये घुमान येथील 88 व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या प्रश्नमंजूषा स्पर्धेत पहिल्या शंभरात स्थान मिळाल्यामुळे 2000 रू. ची ग्रंथ भेट मंडळाकडुन देण्यात आली.

ऑक्टोबर 2015 मध्ये डॉ. A P J अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त आयोजित जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेत उत्तेजनार्थ बक्षीस जाहीर

29 जानेवारी 2017 - श्री यशवंतराव ग्रामीण विकास व शिक्षण प्रसारक मंडळ, करकाळा तर्फे 11वे राज्यस्तरीय लोकसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनात डॉ. नागनाथ कोत्तापल्ले आणि प्रा. शेषराव मोरे यांच्या हस्ते लोकसंवाद 2017 पुरस्कार प्रदान

धन्यवाद ………….!

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.